ढोंगी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून सावधान !

डॉ. बाबा आढाव

सत्यशोधक विचारांना वाहिलेले
दिग्नाग प्रकाशन

ढोंगी रा.स्व. संघापासून सावधान!

-डॉ. बाबा आढाव

प्रथमावृत्ती : २० डिसेंबर २००१ (राष्ट्रसंत गाडगे बाबा स्मृतीदिन)
पुनर्मुद्रण -४ थे, दि. १२ जानेवारी, २०१६ (राजमाता जिजाऊ जयंती)

प्रकाशक व मुद्रक
दिग्नाग प्रकाशन
रविंद्र झेंडे,
सत्यशोधक कार्यालय, ७५४, कसबा पेठ, पुणे -११
मोबा. ७३५०४९८६८५, ९४२२०१५८५४

प्रकाशन समिती
किशोर ढमाले
वामन वळवी
प्रतिक परदेशी
लाजरस गावीत
प्रथमावृत्ती प्रकाशक : किशोर ढमाले

अक्षरजुळणी - बसवराज कदम
सेवा मुल्य : ३०/-

ढोंगी
राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून
सावध

डॉ. बाबा आढाव

KALIM AJEEM
PUNE
MOB.: 9422894029

अनुक्रम

* प्रकाशकाचे दोन शब्द
* प्रास्ताविक
* संघाची ढोंगबाजी
* संघापासून सावध!

* ढोंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून सावध
- डॉ. बाबा आढाव

* प्रकाशक
रविंद्र झेंडे
दिङ्नाग प्रकाशन,
७५४ कसबा पेठ, पुणे -११
मोबा. ९४२२०१५८५४, ७३५०४९८६८५

* सर्व हक्क राखीव

* प्रकाशन समिती
किशोर ढमाले
वामन वळवी
लाजरस गावीत
प्रतिक परदेशी

* प्रथमावृत्ती : २८ नोव्हेंबर, म. फुले स्मृतीदिन - शिक्षक दिन
४ थे पुनर्मुद्रण : दि. २६ नोव्हेंबर २०१६(संविधान दिन)

* मुद्रणस्थळ
शिवानी प्रिंटर्स, कसबा पेठ, पुणे -११

* सेवा मूल्य : ३० रु फक्त

प्रकाशकीय

डॉ. बाबा आढाव यांनी आणीबाणीच्या काळात तुरुंगातील संघजनाचे आलेले अनुभव आणि जनता पक्ष स्थापनेनंतरच्या काळातील संघ नेतृत्व व संघीय राजकारणी यांच्या हालचाली वर्तन आणि जाहीर वक्तव्ये यांच्या प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे हे लिखाण केले आहे. पुढे १९९९ साली पुन्हा केंद्रात भाजपाच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार आले आणि संघाच्या वास्तव स्वरुपाकडे लक्ष वेधणे गरजेचे झाल्याने डॉ. बाबा आढाव यांच्या वेगवेगळ्या लेखांची ही पुस्तिका दिग्नाग प्रकाशनाने पहिल्यांदा प्रसिध्द केली. आज २०१४– २०१५ साली भाजपाचे सरकार देशात आणि राज्यात माध्यमांच्या आधारे केलेल्या बेछूट प्रचारातून सत्तारुढ झाले आहे. अशा वेळी संघाचे डॉ. बाबा आढावांनी काही वर्षापूर्वी केलेले निरिक्षण आणि आजचे संघ भाजपाचे वर्तन हे तंतोतंत जुळणारे दिसत आहे.

जेव्हा भाजप सत्तेच्या जवळ जाण्याची शक्यता असते आणि त्याच वेळी संघाची ब्राह्मणी हिंदुत्ववादी भूमिका त्यांच्या आड येईल असे वाटते तेव्हा त्यांच्या परिवारातील लोकच वावड्या उठवतात, 'संघ बदलतो आहे.... विषमता समर्थन सोडतो आहे....'

संघजन आणि संघ परिवारामध्ये वैचारिकतेचे सोवळे, कर्मकांडांचे स्तोम माजवलेले असते. हिंसाप्रवणता संघ कार्यप्रणालीत बसतेच. संघ बदलत नाही आणि बदलणारही नाही, 'तो बदलतो आहे' अशी कुजबुज करुन बुध्दिभेद करण्याच्या तंत्रात ते इतिहास काळापासून वाक्‌बगार आहेत.

सत्तेवर आल्यावर भाजपा आणि मोदी सरकारने सहिष्णू असल्याचे नगारे माध्यमातून बडवणे सुरु केले आहे. खोटे बोलायचे पण रेटून बोलायचे ही हिटलरी गोबेल्स निती वापरुन सामान्य जनतेची फसवणूक करण्याचे मोठे षडयंत्र कार्यान्वीत झाले आहे. १९७७ सालची निरिक्षणे आजही लागू पडत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील कष्टकरी बहुजनांचे नेते डॉ. बाबा आढाव लिखित या पुस्तिकेचे चौथे पुनर्मुद्रण जनप्रबोधनासाठी प्रकाशित करीत आहोत.

रविंद्र झेंडे

दिग्नाग प्रकाशन,

७५४, कसबा पेठ, पुणे– ११

प्रास्ताविक

धर्मांधता व दहशतवाद या दोन समस्यांचा बीमोड कसा करावा याचा खल आता जागतिक पातळीवर सुरु झाला ही घटना स्वागतार्ह आहे. मात्र ही चर्चा थांबण्याचाही धोका आहे. अफगाणिस्तानातील तालिबानी व अमेरिकासहित मित्र राष्ट्रांच्या फौजा यांच्यातील युध्द लवकरच संपेल. ओसामा बिन लादेन अद्याप हाती लागलेला नाही. तो हाती लागेल हे स्पष्ट दिसते आहे. फक्त जिवंत की मृत एवढाच प्रश्न बाकी आहे. तेथून तो पसार झाला तरी अमेरिका त्याचा पिच्छा पुरवल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. कारण अमेरिकेच्या बुश सरकारची सारी प्रतिष्ठा त्यावर अवलंबून आहे. अमेरिकेला ११ सप्टेंबरचा वचपा काढावयाचा आहे. ओसामा बिन लादेन व त्याच्या समर्थकांनी 'जेहाद' पुकारला आहे. जेहाद म्हणजे धर्मयुध्द. दिल्लीतील जामा मशिदीच्या इमाम बुखारींनी या जेहादला दाद दिली असली तरी दुनियेतील बहुसंख्य मुस्लिम राष्ट्रांनी अफगाणिस्तानवरील अमेरिकन बॉंब हल्यांचा निषेध करुन 'जेहाद'ला साथ दिली नाही. 'सिमी' या संघटनेचे नाव या संदर्भात पुढे आलेले आहे. जमाते इस्लामी प्रमाणेच ही कडवी संघटना आहे. अमेरिकेने अशा कडव्या संघटनांची यादी जाहीर केली आहे. अशा संघटना केवळ कडव्या राहिलेल्या नाहीत. त्या आधुनिक शस्त्रांनी सज्ज झालेल्या आहेत. ११ सप्टेंबर रोजी न्यूयॉर्क शहरातील ११० मजल्याची इमारत व व्यापारी केंद्र बेचिराख करण्यात आले. गुरुची विद्या गुरुच्या कपाळी आली! ...अमेरिका हादरली. दुनिया भेदरली. ....क्षेपणास्त्रानंतर जीवाणू अस्त्रांचा वापर करण्याची धमकी देण्यात आली. 'ॲन्थ्रॅक्स' नावाच्या काळपुळीची लागण सुरु झाल्याने तर अमेरिकेत घबराट सुरु झाली. विमान वाहतूक मंदावली. कारण अतिरेक्यांनी विमानांचे अपहरण चालूच ठेवले. आता ही लढाई आटोक्यात आली आहे असे दिसत असले तरी दुनियेत सर्वत्र बसलेले अतिरेकी व त्यांचे साथीदार स्वस्थ बसलेले नाहीत. त्यांच्याजवळ केवळ अत्याधुनिक शस्त्रे नाहीत तर आत्माहुती देण्याचीही त्यांची तयारी आहे. मराठी भाषेत बोलावयाचे झाल्यास हातावर शीर घेऊन या टोळ्या लढायला सज्ज आहेत. भारतात राजीव गांधीची हत्या करणाऱ्या लंकेतील अतिरेक्यांनी केलेली 'आत्महुती' जनतेला नक्कीच आठवले. अफगाणिस्तानांतील युध्द यथावकाश संपेल. अमेरिका जितं मया म्हणून टेंभाही मिरवेल. परंतु हा सशस्त्र दहशतवाद व धर्मांधता संपुष्टात येईल?.... या प्रश्नाचे उत्तर नाही असेच द्यावे लागेल. ओसाम बिन लादेन व

तालिबानी पुकारलेल्या जेहादला अजिबात प्रतिसाद मिळालेला नाही अशी वस्तुस्थिती नाही.मालेगावात नुकत्याच झालेल्या दंगलीत पकडलेल्या सत्तर जणांनी आपले नाव 'ओसाम बिन लादेन' असल्याचे पोलिसांना सांगितले अशी माहिती प्रसृत झालेली आहे. हे 'धर्मवेड' काही मुसलमानांपुरते मर्यादित राहिलेले नाही हेही स्पष्ट आहे. सासवडमधील दंगल विश्वहिंदु परिषदेच्या प्रेरणेने झाली असे पुरावे पुढे येताहेत. 'जलभिषेक', 'रक्ताच्या थेंबानी शपथविधी,''त्रिशूल वाटप', व आयोध्येत १२ मार्चनंतर व्हावयाच्या राममंदिर बांधणीसाठी नोंदणी असे कार्यक्रम जागोजाग केले जात आहेत. शाळा महाविद्यालयातून 'भगवेकरण' पध्दतशीररीत्या सुरु आहे. इतिहासाचे पाठ्यपुस्तकांचे पुर्नलेखन सुरु आहे. या कामाला पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयींनी जाहीरपणे आशिर्वाद दिला आहे. विश्व हिंदू परिषद हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अपत्य आहे, भावंड आहे. इ.स. २००० साली संघ स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने राष्ट्र जागरण अभियान चालवण्यात आले. या काळात संघाच्यावतीने अनेक पुस्तिका प्रसिध्द झाल्या.

'संघ आणि मुस्लिम समाज', चर्चेत आव्हान, 'रा. स्व. संघ आणि धर्मजागरण', हिंदुत्व जीवन पध्दती आणि जीवनदृष्टी,' हिंदुत्व न्यायलयीन निवाडा प्रश्नोत्तरे- रा. स्व. संघ - गैरसमजांचे निराकरण इ. नावांनी या पुस्तिका प्रसिध्द झाल्या. या प्रत्येक पुस्तिकेत 'संकल्प' या शीर्षकाखाली पुढील मजकूर प्रसिध्द झाला आहे.

आपल्या प्रिय मातृभूमीची म्हणजेच भारतमातेची एकता व अखंडता यांच्या संरक्षणासाठी आणि पवित्र हिंदु धर्मातील व संस्कृतीतील गोमाता, मंदिर यांसारख्या श्रध्देय गोष्टींच्या व माताभगिनींच्या रक्षणासाठी मी कटिबध्द आहे. प्रत्येक हिंदू बंधू-भगिनींच्या धार्मिक संरक्षणासाठी मी प्रयत्न करेन. परमेश्वराने माझा संकल्प पूर्ण करण्याची शक्ती व भक्ती मला द्यावी.

'भारतमाता की जय ।। हिंदू धर्म की जय ।।'

विश्व हिंदु परिषद, बजरंगदल इ. संघटनांच्या वतीने 'जलभिषेक' कार्यक्रमात होणाऱ्या शपथविधीतील 'शपथ' लेखी स्वरुपात आमच्या हाती अद्याप आलेली नाही. कारण हे कार्यक्रम काहीशा गुप्त पध्दतीने होतात.

१९९२ साली अयोध्येतील 'बाबरी मशिद उद्ध्वस्त करण्यात आली. त्यावेळी केंद्रात कॉंग्रेस व उत्तर प्रदेशात भाजपाच्या कल्याणसिंहाची सरकारे होती. संध्या केंद्रात भाजप आघाडीचे व उत्तरप्रदेशात भाजप सरकार आहे. गुजराथही

भाजपाच्या हातात आहे. पंतप्रधान व गृहमंत्री वरचेवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांना हजेरी लावतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून त्यांना सतत मार्गदर्शन केले जाते. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास सध्या देशात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राज्य सुरु आहे.

'संघटित हिंदुधर्म' भारताला परम वैभवाला नेणारे लक्ष्य गाठण्यासाठी देशभर ४० हजार शाखा, २७००० सेवा कार्ये, १६००० विद्यालये, २१ लाख विद्यार्थी, ९० हजार शिक्षक व ५० लाखावर स्वयंसेवक सज्ज आहेत. त्यांचे स्वरुप निमलष्करी आहे. आजच्या घटकेला प्रसारमाध्यमांवर सर्वाधिक प्रभाव राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आहे. हातात असलेल्या राजकीय सत्तेचा वापर अत्यंत धूर्तपणाने केला जात आहे. नीती व मूल्यशिक्षणाच्या नावाखाली प्रत्येक शाळेत वंदेमातरम् व सरस्वतीपूजन सक्तीचे केले जात आहे. वंदेमातरमची पहिली दोन कडवी म्हणायला सर्वांची मान्यता असते, परंतु संघजन पूर्ण वंदेमातरम्‌चा आग्रह धरतात. त्याबाबत जेलमधील आमचा अनुभव अन्यत्र दिलेला आहे.

संघाला साधनशुचिता मान्य नाही. हिंसाही वर्ज्य नाही. 'दंगली धार्मिक असतात काय?' या प्रश्नावर पुण्यात फुले-आंबेडकर व्याख्यानमालेत नुकतेच पुण्याचे अतिरिक्त पोलिस आयुक्त श्री. श. मि. मुश्रीफ यांचे भाषण झाले. त्यांनी दंगलीतील क्रियाशील घटकांचे तीन वर्ग सांगितले. दंगलीची प्रेरणा देणारा पहिला वर्ग असतो. हा प्रत्यक्ष दंगलीत भाग घेत नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नेमकी ही भूमिका बजावतो. त्यामुळे 'करुन सवरुन नामनिराळे' राहता येते. सोवळे पांघरता येते. संघाला फॅसिस्ट म्हटलेले आवडत नाही. वास्तविक ही टोपी संघाला अगदी फिट बसते.

या देशातील आर्थिक मंदी, बेकारी, भ्रष्टाचार, पर्यावरण ऱ्हास, इ. प्रश्नांबद्दल संघ उदासीन आहे. धर्माच्या नावाने संघ तरुणांना धर्मांध बनवित आहे. हे करताना संघ मुत्सद्दीपणाने मुस्लिम, ख्रिश्चनांच्या देशनिष्ठेबद्दल सतत 'संशय कल्लोळ' माजवीत असतो. 'धर्मांधता' मग ती कोणत्याही धर्माची असो, आम्हाला मान्य नाही. संघ आम्हाला 'नकली धर्मनिरपेक्षतावादी' कितीही म्हणू देत, परंतु आमची भूमिका स्पष्टपणे धर्मनिरपेक्षतावादी आहे. एक गाव-एक पाणवठा मोहिमेत गावाची विहीर सर्वांना खुली व्हावी ही मागणी करताना आम्ही सोवळे-ओवळे घरी ठेवायला सांगत होतो. स्वच्छतेचा आग्रह धरीत होतो. धर्माचे स्वरुप खाजगीच राहायला हवे. म. ज्योतिराव फुले म्हणतात-

जगामाजि धर्म अगणित होती ।।
लढाया खेळती ।। रेड्यापरी ।।
रेडे धरणारे प्राणास मुकती ।।
कित्येक म्हणती ।। स्वर्गी गेले ।।२।।
कोणी म्हणे सर्व मार्टर झाले ।।
जन्नतीस गेले ।। कोणी म्हणे ।। ३।।
सद्विवेकावीण सर्व भांबावले ।।
रक्त पाती झाले ।। जोती म्हणे ।। ४।।

KALIM AJEEM
PUNE
MOB.: 9422694029

फुल्यांनी सार्वजनिक सत्यधर्माची मांडणी केली आहे. 'धर्म राज्य भेद मानवा नसावे' हा त्यांचा संदेश आहे. संघाने म. फुले, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. च्या नावाचा फार खुबीने वापर चालवलेला असतो. सामाजिक समता संघाला अभिप्रेत नसते. म्हणून त्या ऐवजी 'सामाजिक समरसता' शब्द वापरला जातो व तसे कार्यक्रम केले जातात.

संघाला भारतीय संविधान खऱ्या अर्थाने मान्य नाही. ते 'भंगार' झाले आहे असे जाहीरपणे ही मंडळी बोलतात. धर्मनिरपेक्षता त्यांना नकली वाटते. समाजवादाशी त्यांचे हाडवैर असते. संघ धर्मांध आहे हे उघड आहे. त्यांचा दहशतवाद छुपा आहे. भारतातील जातीव्यवस्थेचा ते फार खुबीने वापर करुन घेतात.

मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, लिंगायत, पारशी, ज्यू, शीख, आदिवासी इ. धर्माची यादी भारतीय संविधानात दिलेली आहे. भारतात दुनियेतील कन्फ्युशिअस व शिंटो या धर्मियांशिवाय सर्व धर्माचे नागरिक आहे.

दुनियेला धर्मांधता व सशस्त्र दहशतवादाने ग्रासले आहे. त्याला उत्तर धर्मांधतेने देवून भागणार नाही. धर्मनिरपेक्षतेनेच उत्तर देता येईल. भारतात संसदीय लोकशाही धर्मनिरपेक्ष पायावर रुजली आहे. धर्मनिरपेक्षता रुजली तर भारताच्या प्रगतीचा वेग वाढेल. भारताला धर्मराष्ट्र बनविण्याचा उद्योग थांबवला पाहिजे. धर्मांधता व दहशतवादाशी वेळीच मुकाबला केला पाहिजे.

संघाची ढोंगबाजी (१९७७) व संघापासून सावध! (१९७९) या दोन पुस्तिका एकत्रित करुन नवी पुस्तिका पुढे आणली जात आहे. आम्हाला ही बाब स्पृहणीय वाटते. ३०-३२ वर्षानंतरही परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही हे पाहून विषादही वाटतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या

दिवशी ही नवी आवृत्ती प्रकाशित केली आहे. एक औचित्य साधले जात आहे. दहशतवादाला कठोर कायद्यांनी आळा घालता येतो, परंतु धर्मांधतेबाबत तसे म्हणता येणार नाही. धर्मांधतेविरुध्द लढायचे असेल तर धर्मचिकित्सा करावीच लागेल. धर्मचिकित्सेला विरोध करणाऱ्यांना 'धर्मांध' मानले जावे. रा. स्व. संघ इ. छुप्या पध्दतीने धर्मांधतेचा वापर करतात हेही यावेळी लक्षात घेण्याची गरज आहे.

धर्मांध संघटनांना मिळणारे आर्थिक सहाय्य भरघोस आहे. या संघटनांवर आर्थिक हिशोब देण्याचे कायदेशीर बंधन नाही. संघ तर त्यातून शिताफीने सटकतो. त्याबाबत आम्ही भरपूर चिकित्सा केली आहे.

दहशतवादाला आळा घालण्यासाठी भारतात पोटा कायदा पास करण्यासाठी केंद्र सरकारला घाई झाली आहे. माणसांच्या पोटापाण्याचे प्रश्न सरकारला सोडवता आलेले नाहीत. जागतिकीकरण, खुलीकरण, खाजगीकरणामुळे राजकारणी मंडळीही धंदेवाईक बनवली आहेत. अशा ज्वलंत प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी संघाने हिंदूधर्म बाजारात आणला आहे. बहुजन त्याला भुलणार नाहीत याची दक्षता फुले-आंबेडकरवाद्यांनी बाळगण्याची गरज आहे. यावर्षाच्या सुरुवातीला म्हणजे २६ जानेवारी २००१ रोजी आम्ही जयपुरातील हायकोर्टासमोर 'मनू पुतळा हटाव' सत्याग्रह केला. परंतु त्याच दिवशी गुजरातेत प्रचंड भूकंप झाल्याने सत्याग्रह स्थगित करावा लागला. या सत्याग्रहाच्या तयारीसाठी आम्ही राजस्थान व मध्यप्रदेशातील काही गावांना भेटी दिल्या. पदयात्रा केल्या. मध्यप्रदेशातील उज्जैन कुंभमेळ्याचे ठिकाण, तर राजस्थानातील जुने राजपूत राजे व बनिये यांना हाताशी धरुन संघप्रेरणेने अनेक मंदिराची उभारणी होत आहे. फुले-आंबेडकर-शाहू विचारांचा तेथे मागमूसही आढळला नाही. फुले-आंबेडकर शाहूवाद्यांनी हे आव्हान मानले पाहिजे. फुले-आंबेडकर-शाहू महाराजांच्या विचारकार्याची भारताला सर्वाधिक गरज आहे. १९०२ साली कोल्हापूर संस्थांनात शाहू राजांनी ५० टक्के जागा दलित बहुजनांसाठी राखीव केल्या, या घटनेस १०० वर्षे पूर्ण होताहेत. ही बाब सर्व देशाला गौरवाने सांगितली पाहिजे. फुले-आंबेडकर-शाहूंनी सुरु केलेली सामाजिक चळवळ सर्व देशभर सुरु केली पाहिजे. धर्मांधता व दहशतवादाला स्त्री शूद्रातिशूद्रच उत्तर देवू शकतात. ब्राह्मणाचे डोके व बहुजनांचे हात ही फारकत संपुष्टात आली पाहिजे. संघाचा डाव हाणून पाडला पाहिजे.

डॉ. बाबा आढाव
४ डिसेंबर २००१, पुणे

संघाची ढोंगबाजी

आणीबाणीतील स्थानबध्दतेच्या काळात येरवडा कारागृहात एकत्र राहिल्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला फार जवळून पाहता आले. सरसंघचालक श्रीमान बाळासाहेब देवरस यांचेसह संघाचे अनेक पदाधिकारी येरवडा कारागृहातच होते. राजकीय स्थानबध्दांच्या आमच्या संख्येत रा. स्व. संघाच्या मंडळीचा भरणा बराच मोठा होता. येरवडा जेलमधील सुमारे ३५० च्या संख्येत त्यांची गिनती २००-२२५ पर्यंत होती. त्यामुळे संघजीवनाचा, संघकार्याचा एक दबदबा निर्माण झाला होता. इतर राजकीय स्थानबद्धांमध्ये समाजवादी, जनसंघ, शेकाप, सर्वोदयवादी, डावे कम्युनिस्ट, जमाते इस्लामी, आनंदमार्गी इ. संघटनांचा भरणा होता. आणीबाणीचे राज्य व मिसा कायद्याखाली झालेली स्थानबद्धता हे सर्वांवर आलेले समान संकट होते. आणि संकटकाळी एकजूटीच्या विचारांना चालना मिळणे स्वाभाविक होते. तुरुंगातील कोणत्याही सभेत, वा अन्य कार्यक्रमात, चर्चेत, बैठकीत एकजूटीचे सूत्र सांभाळण्याचा कसोशीने प्रयत्न होई. आणीबाणीच्या अगोदरपासूनच जयप्रकाश नारायणांनी 'एकपक्ष'चा नारा लावलेला होता. काँग्रेसविरोधी राजकीय पक्षांतून विशेषत: जनसंघ, समाजवादी, संघटना, काँग्रेस भारतीय क्रांतीदल या पक्षाचे कार्यकर्ते रात्रंदिवस या विषयांवर काथ्याकूट करीत. आणीबाणी व मिसा राज्याचा धाक जबरदस्त होता. समदु:खी मंडळी समविचाराचा प्रयत्न करीत. जेलच्या वातावरणात एक अपरिहार्य जवळीक होती व या जवळीकीमुळे परस्परांच्या विचारांबरोबर कार्यपद्धतीची ओळखही करुन घेता येई.

१९-२० महिन्यांचा दीर्घकाल एकत्र सहवास असल्याने अनेक व्यक्ती, संघटना, पक्ष यांचे खरे स्वरुप न्याहाळणे शक्य होई. रा. स्व. संघाचा 'माणसे घडविण्याचा' कारखाना यामुळेच बारकाईने पाहता आला. आत आलेली बहुतेक माणसे संघात घडलेली होती. या घडवलेल्या मूर्ती कशा वागतात, कशा विचार करतात, त्यांचे विचार व आचार विश्व, साऱ्या गोष्टी पाहता आल्या. मला वाटते येरवड्यातील स्थानबद्धांचे सरासरी वय ४५ ते ५० वर्षाचे असावे. त्यामुळे कुठल्याही समारंभात डोक्याची टकले व पिकलेले केस सहजपणे नजरेत भरत. केंद्र व महाराष्ट्र सरकारने जयप्रकाश नारायणांचे वय लक्षात घेऊनच माणसे आत आणावयाची असे

ठरविलेले असावे.

आणीबाणीच्या काळात भविष्याबद्दल सर्व मंडळीच्या मनात एक प्रकारची अनिश्चितता होती. तुरुंगवासात तिची जाणीव तीव्रतेने होई. 'सुटका कधी होईल का?' हा जीवघेणा प्रश्न फार छळत असे. तरिही मंडळी स्थितप्रज्ञतेचा मुखवटा कसोशीने धारण करीत. इंदिरा गांधीनी संघ-जनसंघाला धारेवर धरल्याने त्या मंडळीची अवस्था व वैचारिक दोलायमान, फरफट तर विलक्षण बनली होती. सुटकेसाठी सामुदायिक प्रयत्नांबरोबर वैयक्तिक प्रयत्नांची हालचाल अशावेळी अपरिहार्य बने. व्रतवैकल्यापासून शासनाकडे वैयक्तिक पत्रे व वशिल्याचा शब्द टाकण्याचा प्रयत्न होणेही स्वाभाविक होते.

वैचारिक त्रेधातिरपीट

हिंदू, संघटन, हिंदू राष्ट्र, हिंदू संस्कृती, हिंदूंचा इतिहास हे शब्द प्रतिदिनी कानांवर पडत. संघजनांनी तुरुंगवासाच्या कालात स्वत:चे संघजीवन संघटित केलेले होते. शिस्त हा शब्द संघाला अगदी प्राणप्रिय. विचारापेक्षा आचारांचे शिस्तबध्द कर्मकाण्ड व त्याचे स्तोम हे आणखी एक वैशिष्ट्य. कधी नव्हत संघीयांना वैचारिक पातळीवर इतरांच्याबरोबर चर्चा करण्याचा प्रसंग आलेला, आणि अशावेळी त्यांची केवढी त्रेधातिरपीट उडे। संख्याबलाचा फुगा अशावेळी क्षणार्धात फुटत असे. आपले वैचारिक रितेपण झाकण्याचा ही मंडळी केविलवाणा प्रयत्न करीत. परंतु तुरुंग ही चीजच अशी आहे की जेथे सारे उघड्या नागड्या स्वरुपात पाहावे लागते.

बाहेर संघ बंदी जारी होती. परंतु आत शाखाकार्य चालत असे, झेंडा फक्त लावला जात नसे.

अर्धी खाकी चड्डी प्रत्येकाने आणली होती. सर्वांगसुंदर व्यायाम, प्रात:स्मरण, योगासने, जाता येताना सूर्यनमस्कार इ. कार्यक्रमाने सकाळ सुरु होई. प्रात:स्मरणात गीता, ज्ञानेश्वरी पसायदान, थोरांचे स्मरण इ. भाग असे. काही बराकीतून संस्कृतातील मंत्रपठण चाले. आणीबाणीतून सुटका होण्यासाठी काही कोटी सूर्यनमस्कारांचा संकल्प संघजनांनी निष्ठेने पुरा केला. हे व्रत खास 'सज्जनगडी' होते. या व्रतात भाग घेणाऱ्याने रोज ६० सूर्यनमस्कार घालायचे. आता कोणी असा प्रश्न काढला की इंदिरा गांधींना निवडणूका घेण्याची बुध्दी अचानक कशी काय सुचली? तर संघजनांजवळ 'कोटीकोटी सूर्यनमस्कार' हे तात्काळ उत्तर आहे म्हणून समजा !

तुरुंगातील शाखा

शाखा रोज सकाळी भरत. रविवारी सायंकाळी एकत्र मेळावा असे. म्हातारी मंडळी देखील वेळेवर हजर राहत. शाखा विविध विभागात भरत. त्यांच्या आपसात स्पर्धा होत. खेळ, गाणी इ. कार्यक्रम चालत. काही मंडळी योगासनांचे वर्ग चालवीत. त्यात संघाबाहेरील मंडळीही भाग घेत. अशा वर्गाची प्रात्यक्षिके संघाच्या खास समारंभात होत. वर्ग चालविणारे मात्र संघाशी संबंध नसल्यासारखा बहाणा दाखवीत. यानंतर स्नान, संध्या करण्यासाठी उदंड झाले पाणी ! अशी परिस्थिती असे. दिन विशेष हा पंचागांतून शोधलेला. आणि त्याबरहुकुम कार्यक्रम असत. चतुर्थी एकादशी, प्रदोष, सोळा सोमवार इ. व्रते बरेचजण पाळीत. साधारण ८-८।। ला व्यावसायिक गटांच्या बैठका होत. शेतकरी, शिक्षक, वैद्यकी करणारे इ. या मंडळींच्या गोलाकार बैठकीत चर्चाही गोलमोल चाले. शेतकऱ्यांच्या बैठकीत मजूर कसे माजले आहेत! हा खास टॉपिक असे. प्रत्यक्ष अंगमेहनत करणारे हाताच्या बोटांवर मोजता येतील येवढेही नव्हते. होते ते जुने खोत सावकार. आधुनिक औषधाच्याऐवजी पिकांवरील कीड घालविण्यासाठी गोमूत्र व दूधाचा वापर कसा करता येतो, यावर बोलणे निघे. कधीमधी चर्चेत निरनिराळ्या महाराज, बुवा मंडळीच्या कथा निघत. मग एकेकाच्या वाणीला रसवंती प्राप्त होई. रत्नागिरी जिल्ह्यातील पावसच्या महाराजांचे वर्णन असेच एकदा सुरु झाले होते. कोल्हापूरच्या एका समाजवादी शेतकऱ्याने बुवांचे ढोंग कोल्हापूरी पध्दतीने चव्हाट्यावर आणल्याबरोबर विषयच बंद झाला. बाजू अंगावर येते आहे असे पाहिले की विषय बंद! सकाळी १०।। ते ११ ।। पर्यंत संघाच्या खास बौध्दिक बैठका असत. वक्त्याने काय वाटेल ते बोलावे आणि संघजनांनी ते सारे शिस्तीत ऐकून घ्यावे. जेलमधील सर्वपक्षीय नेतृत्व मंडळाने सामाजिक एकरसता हा विषय सर्वांना देऊन एका व्याख्यानमाला आखली होती. या व्याख्यानमालेत अनेकांनी आपले विचार मांडले. दलित, आदिवासी, स्त्री स्वातंत्र्याच्या प्रश्नावर चर्चा झाली. अशा चर्चेत अनेक नवे विचार ऐकायला मिळत. संघजनांच्यावर त्याचा काही परिणाम होत असणार. यावर एक उपाय योजलेला असे. आदल्या दिवशीच्या सभेत व्यक्त केलेल्या विचारांवर दुसऱ्या दिवशी सकाळच्या खास संघ बैठकीत मल्लीनाथी होई. एकदा बाबा भिडे यांनी अशा बैठकीत 'स्त्रियांना स्वातंत्र्य द्या म्हणे !' ....एकीला दिले....काय झाले ?.. ह्यॉ, ह्यॉ, ह्यॉ ह्यॅ असे म्हटले नव्या विचारांची खिल्ली उडवण्याचे एक खास तंत्र जणून

या मंडळींनी जोपासलेले.

बाबा भिड्यांची भावजय त्यांना भेटायला येई. बाई बऱ्याच वयस्कर होत्या. जेलमधील सरकारी भेट खोलीत त्या सर्वांसमक्ष दिराचे पाय धरीत आणि हेही ऐटीने पाय पुढे करीत. दुपारच्या वामकुक्षीनंतर भर दुपारी २ वाजता 'झोपमोड बैठक'असे. ठरीव साचाची उत्तरे घोटून घोटून दिली जात. कोणताही संघ कार्यकर्ता विचाराने वर्तुळाच्या बाहेर पडू नये यासाठी हे सारे तंत्र वापरले जाई.

अस्पृश्यतेचा 'साबण' संघशाखा

सायंकाळी सभा, चर्चासत्रे भरत. त्यानंतर रामरक्षा व गीत पठण होई. काही बराकीतून भजने व कीर्तने चालत. त्यासाठी तबला-पेटी वादनाचे वर्ग चालत. बुध्दीबळे, पत्ते इ. सामने भरविले जात. या सर्व दैनंदिनीत शारीरिक उत्पादक श्रमाला कधीच स्थान दिलेली तरी मी पाहिलेले नाही. म. गांधीचे नाव प्रात:स्मरणात घेतले जाई. परंतु म. गांधींची अंत्योदयाची कल्पना स्वीकारल्याचा प्रत्यय कधीच आला नाही. संघजनांनी सफाई केली असे कधी मी पाहिले नाही. सरसंघचालक श्रीमान बाळासाहेब देवरस जेलमधेच ६० वर्षांचे झाले. त्यांच्या अभिष्टचिंतनाच्या सभेत 'अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील कलंक आहे' असे ते म्हणाले, आमच्या एकपक्षवादी समाजवादी मित्रांना या एका वाक्यामुळे अगदी अस्मान ठेंगणे झाले. (अशा सभांचे नियोजन करताना एखाद्या दलित वक्त्याला आवर्जून बोलण्याची संधी दिली जाई. बाळासाहेबांचे अभिष्ठचिंतन करण्याच्या सभेत जमाते इस्लामीच्या वक्त्यानेही भाग घेतला होता.) अस्पृश्यतेचा कलंक धुवून काढण्याचा 'साबण' कोणता?....त्याचे उत्तर 'संघशाखा!'

संघातील सोवळे ओवळे

येरवडा जेलमधून काही मंडळींनी आपापल्या जिल्हा जेलकडे ट्रान्सफर्स करुन घेतल्या. धुळे जेलमध्ये सोळा सोमवारच्या व्रताची सांगता झाली. सर्व स्वयंपाक सोवळ्यात झाला. नेहमीच्या स्वयंपाकी कैद्याना त्या दिवशी मनाई करण्यात आली. या सोवळेपणाला विरोध म्हणून माझ्या चार समाजवादी मित्रांना त्या दिवशी अक्षरश: उपवास घडला. सोवळे कायम ठेवून 'ओवळे' कसे जाणार? संघजनांना असले प्रश्न टाळण्याचे शिक्षण फार पद्धतशीरपणे दिले जाते.

तुरुंगात संघजनांच्या तालुका, जिल्हा बैठका होत. खाण्याचे कार्यक्रम होत. भोजनाचे कार्यक्रम होत. अशा कार्यक्रमांना सरसंघचालकांना खास निमंत्रण असे. त्यांच्याबरोबर इतर चार दोन पाहुणे निमंत्रित केले जात. अशी भोजने बराकीवार

चालत. तालुका जिल्हावार चालत.

संघप्रवृत्तीत जोपासलेले विविध गट आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, जनसंघ युवक आघाडी, पतित पावन संघ, जनसंघ, भारतीय मजदूर संघ, रा. स्व. संघ इ. नावे आत घेतली जात आणि त्यांचे स्वतंत्र प्रतिनिधी कोठल्याही कमिटीवर घ्यावे लागत.

एखादा कार्यक्रम सामुदायिकरीत्या साजरा करावयाचा की नाही याचा निर्णय ही समिती घेई. संघजनांना अप्रिय वाटणाऱ्या कार्यक्रमास खो देण्याची व त्यांना प्रिय असणाऱ्या कार्यक्रमास अग्रक्रम देण्याची हिकमत ते यशस्वी करीत. उदाहरण द्यायचे झाल्यास १ मे या दिवसाचे देता येईल. १ मे १९७६ ला शिवजयंती, महाराष्ट्र राज्यदिन, कामगारदिन एकत्र आले. संघजनांनी शिवजयंती अगदी इतिहासात जाऊन साजरी केली. कामगारदिन गैरहजेरीने !

फिरती चतुर्थी

सामुदायिक कार्यक्रमात हिंदूंच्या धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असे. संकष्टी चतुर्थी असली की दिवसभराचे वातावरण गणपतीमय. उपवासकर्त्यांची व उपवासपदार्थांची यादी जेलव्यवस्थेकडे दोन दिवस अगोदर जायची. मग तो स्पेशल स्वयंपाक, दुर्वा खुडणे व जुड्या तयार करणे, सायंकाळी खास पूजा, गणपतीच्या मूर्तीसाठी खास मखर, भोवती विजेची रोषणाई, मंत्रोच्चारात पूजा व पुढे सरसंघचालकाच्या उपस्थितीत अथर्वशीर्षाचे दहा वेळा पठण, नंतर प्रसादग्रहण व कॉफीपान,. या समारंभासाठी जेलव्यवस्थेने बसण्यासाठी घोंगड्या पुरवायच्या, कॉफीसाठी मग पुरवायचे, (शंभरांच्या संख्येत), कैद्यांनी पाणी भरुन ठेवायचे. सारे प्रांगण झाडून, सारवून ठेवायचे, दीडदोन तासांचा हा कार्यक्रम. संघेतरजनांना कपाळावर गंध, कॉफीपान व प्रसाद ग्रहणाचे निमंत्रण असे. ही चतुर्थी फिरती असे. आज ह्या बॅरकीकडे व्यवस्था तर दुसऱ्या वेळेस दुसऱ्या बॅरकीकडे. संघजनांचा उत्साह अशा वेळी ओसंडून जात असे. प्रत्येकाच्या कपाळावर गंधाक्षता लावण्यापासून कार्यक्रमाला सुरुवात होई. सत्यनारायण पूजा अशाच. शिवरात्र, एकादशी हे दिवस भजन कीर्तनाने साजरे होत. संघात कीर्तनकार, भजनी गाणारे, तबलजी, पेटीवाले यांची वर्दळ बरीच मोठी असावी. असा एखादा कार्यक्रम साजरा होण्यापूर्वी महिना महिना प्रॅक्टीस चालत असे. वर्षप्रतिपदा, रामनवमी, हनुमान जयंती, ज्ञानेश्वर जयंती, गीताजयंती, गुरु पौर्णिमा, मोठ्या एकादशा, संक्रान्त, विजयादशमी, श्रावणी, रक्षाबंध, दीपावली, होळी इ. दिवसांच्या थाटामाटाचे वर्णन

तर किती करावे ? विजयादशमीसारख्या कार्यक्रमात सरसंघचालकांना सलामी दिली जाई. संघजनांच्या परेडस् चालत.

आज एकदा पुन्हा सिंहनाद होऊ दे ।
आज एकदा पुन्हा तुतारी भेदी गर्जू दे ।

या रणगीतात या बरॅकीतून त्या बरॅकीत परेडची मिरवणूक जाई. जेल अधिकाऱ्यांनी दटावणी केली की ही परेड बरॅकीभोवतीच चक्कर मारी. विजयादशमीच्या अगोदर कित्येक दिवस सामने सुरु असत. ब्रिजच्या खेळापासून रस्सीखेच पर्यंत ! संघेतरजनांना अशा कार्यक्रमात सामावून घेण्याच्या कसोशीने प्रयत्न होई. यशस्वितांना सरसंघचालकांच्या हातून नारळासारखी बक्षिसे दिली जात. सीमोल्लंघनाने मन इतिहासांत सीमापार गेलेले.

संघाचा टाईमपास : कर्मकांड

वैयक्तिक व्रत वैकल्यांच्याबद्दल तर काय काय लिहावे? माझ्या पाठीमागच्या बरॅकीतील संघातील एक सज्जन उंबराच्या झाडाला रोज सकाळ-संध्याकाळ हजार-हजार प्रदक्षिणा घालत असत. त्याच्या प्रदक्षिणांमुळे झाडा-भोवती एक चाकोरीच तयार झाली होती. देवाला चालणारी फुले ठरलेली असत. सदाफुली कोणत्याच देवाला चालत नाही हे आम्हाला तेथेच कळले आणि असे अनेक वैशिष्ट्यपूर्ण देव जेलमध्ये याकाळात अवतरले. काही मंडळींना दुर्वा खुडण्याचा उद्योग असे. त्यांच्या गणपतीला गुलाबाशिवाय दुसरे फुल आवडत नसे. महादेवाच्या पिंडीवर गळती. मारुतीची साप्ताहिक पुजा एक वैद्यराज होम हवन करीत त्यांना गाईचे शेण लागे. ते नाही मिळाले तर पिंपळाच्या झाडाच्या काटक्या गोळा केल्या जात. हे सर्व विधी पुर्ण करताना भाग घेणारे अगदी आसुललेले असत.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे हिंदुधर्मातील कर्मकाण्ड हा संघजनांचा टाईम पास करण्याचा कार्यक्रम. या कर्मकाण्डामागच्या नीतीच्या प्रश्नांवर ही मंडळी पूर्ण उदासीन. ब्राह्मणी संस्कृतीचा, उच्चभ्रूंच्या जीवनाचा संघावर केवढा प्रभाव आहे. याची प्रचिती मला तुरुंगात आली. आपल्याशिवाय आणखी जग आहे याची या मंडळींना जाणीव नाही, पर्वा नाही. शोषण, संघर्ष असले शब्द संघाला अजिबात अभिप्रेत नाहीत. जेलमधल्या गुन्हेगार कैद्यांशी वागताना ही गोष्ट वरचेवर लक्षात येई. हमरीतुमरीवर येणे हा यांचा विशेष गुण. परमतसहिष्णुता हे शब्द फक्त नावालाच उच्चारायचे. संघाचे एक प्रमुख पदाधिकारी इतर धर्मातील प्रेषितांबद्दल किती तुच्छतेने बोलू शकतात, हे मी कानाने ऐकले आहे.

'यवनी'नावाबद्दल तर संघजनांना खास घृणा. उस्मानाबाद जिल्ह्याचे नाव संघाच्या यादीत 'धाराशिव' जिल्हा. इस्लामपूरचे ईश्वरपूर. जनसंघाच्या महाराष्ट्र शाखेचे पदाधिकारी श्री. अण्णा डांगे यांच्या खोलीच्या दरवाजावर गावाचे नाव ईश्वरपूर लिहिले होते. ते इस्लामपूरचे.

आक्रमक परमतअसहिष्णुता

परमतसहिष्णुतेचा तर माझाच एक अनुभव लिहिला तर अप्रस्तुत होणार नाही. रक्षाबंधन हा संघीयाचा आवडता उद्योग. सकाळी श्रावणी, नंतर रक्षाबंधन, शिरस्त्याप्रमाणे आमच्या बरॅकीतील संघजन आमच्या हातावर राखी बांधून गेले. नमस्कार चमत्कार झाले. सायंकाळी उन्हे उतरल्यानंतर आम्ही फिरायला बाहेर पडलो. तास दीडतासानंतर बरॅकीत परत यायला निघालो तर मेनगेटजवळ मित्राकडून वर्दी मिळाली, 'बाबा आढाव', तुमची प्रेतयात्रा निघणार आहे...तुम्ही श्रध्दा दुखावल्या आहेत. मला काहीच बोध होईना. सायं ७॥/८ ची वेळ असावी. परत फिरलो तर लक्षात आले की आमच्या बरॅकीतील एका गुन्हेगार कैद्याला ७-८ संघजनांनी धरुन चालवला होता. (त्याला शेतीकामाची माहिती होती आणि आम्ही काही सहकाऱ्यांनी मिळून एक चांगली नर्सरी तयार केली होती. आमचा भाग त्यामुळे फार प्रसन्न दिसे. निरनिराळी पिके तरारुन आली होती. गुलाब मोगऱ्यांचे जुनेच ताटवे आम्ही मशागतीने फुलवले होते. तर या नर्सरीचा तो मदतनीस) त्याला ही पतितपावन, अ. भा. वि. प. संघ, जनसंघाची मंडळी दटावीत होती. तू नाव सांग...'

प्रकार असा घडला होता की, आम्ही हिंडायला निघून गेल्यानंतर कैदी मंडळी एकत्र बसली होती. बागेला दृष्ट लागू नये यासाठी त्यांच्या मनात काहीतरी काळे टांगायचे होते.

एक मेलेले वटवाघूळ त्यांना मिळाले. त्याचे पोट साफ करुन आत गवत भरले. दोन्ही पंखांना दोऱ्या बांधून त्याने ते दोन झाडांच्या मधे बांधले. वटवाघूळ बांधलेले लक्षात यावे म्हणून एक दोन रंगीबेरंगी राख्या बाजूला बांधल्या झालं..!

वटवाघूळाला राखी बांधली। केवढा हा अपमान। श्रध्दांचा प्रश्न।..

बिचाऱ्या कैद्याला मेनगेटवर नेण्यात आले. सर्व जेलव्यवस्थेला कापरे भरले. रात्रीपर्यंत सर्व अधिकारी जमा झाले. संघजनांची मागणी एकच-

'या मागे कोणाचा तरी मेंदू असावा. त्याची चौकशी झाली पाहिजे. आमच्या श्रध्दा दुखावल्या आहेत ! एका बहाद्दराने तर त्या कैद्याला बाजूला घेऊन सांगितले, तू बाबा आढावचे नाव घे.... तुला सजेत सूट मिळवून देऊ.. परंतु

बिचाऱ्याने खरे तेच सांगितले.

जेल अधिकारी व संघीयांचे प्रमुख यांच्या संयुक्त बैठकीपुढे चौकशी झाली. शेवटी जेल अधिकारी चिडून म्हणाले, हा कैदी तुम्हाला पाहिजे ते नाव घेत नाही. तुमच्या ताब्यात या कैद्याला देतो. काय करायचं ते करा.... मंडळी हात हालवीत परत बराकीत आली. मला दुसऱ्या दिवशी हा प्रकार कळला. असे हमरीतुमरीचे २-३ प्रकार तुरुंगात घडले.

संघातील प्रस्थे

व्यक्तींचे स्तोम माजवणे हा आणखी एक छंद या मंडळींना आहे. २६ जाने. १९७६ ला आम्ही सर्वांनी मिळून वगनाट्य सादर केले. संगीत आणीबाणी या वगनाट्यात 'मिसा कायद्याविरुध्द कोर्टात जात का नाही' बाबा भिडे वकिलांना केस दे... असे पेंद्या सुदाम्याला सांगतो. तर पुढे त्याच संवादात पेंद्या सांगतो 'बीमार गवळणीला जरा ओव्हरहॉल करुन आण. पाहिजे तर डॉ. पूर्णपात्रे यांना दाखव.'

श्री. बाबा भिडे व डॉ. पूर्णपात्रे ही संघातील मोठी प्रस्थे. वास्तविक त्यांची कसलीही टिंगल या वर्गात नव्हती. परंतु प्रॅक्टीसला येणाऱ्या एका संघवाल्याने चुगली खाल्ली आणि माझ्याकडे संघजनांची शिष्टमंडळे येऊ लागली. कोल्हापूरच्या एका जनसंघाच्या कार्यकर्त्याने मला सांगितले, 'भिडे व पूर्णपात्रे यांची नावे काढा, नाही तर आम्हालाही तुमच्यावर काहीतरी लिहावे लागेल.' वाद नको म्हणून मी नावे बदलून समाजवादी पक्षाच्या माळी वकिलाचे व डॉक्टर म्हणून माझे नाव घेतले. हा सर्व कार्यक्रम झकास वठला. परंतु शेवटी संघजनांनी संपूर्ण वंदेमातरम् म्हणण्याचा आग्रह धरला तो पुरा केला. त्याला अडथळा करणाऱ्यांविरुध्द दुसऱ्या दिवशी सकाळी आरडाओरडा सुरु केली. सर्व कार्यक्रमाला गालबोट लागले. पुढे कित्येक दिवसपर्यंत बाबा आढावांना कसा धडा शिकवला याचे वर्णन ही मंडळी करीत. श्रध्दास्थानाला धक्का लावता काय?

एक गाव एक पाणवठा पुस्तकाचा प्रकाशन समारंभ तुरुंगात कोल्हापूरच्या बापूसाहेब पाटलांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. बापूसाहेबांनी मला उद्देशून भाषण केले. कारण तुरुंगात मी एक विशिष्ट वैचारिक भूमिका घेतली होती. एका पक्षाची जडणघडण मला मान्य नव्हती. संघ, जनसंघासारख्या सांस्कृतिकदृष्ट्या प्रतिगामी पक्षांबरोबर युती करण्याने निवडणूका जिंकता येतील. परंतु परिवर्तनाचे उद्दिष्ट मात्र पराभूत होईल असे मला वाटे. त्यामुळे आम्ही काही जणांनी शेवटपर्यंत एक पक्षाच्या निर्मितीला विरोध केला. म्हणून तुरुंगवासातील चर्चासत्रात मी वक्ता

म्हणून भाग घेत नसे. तेथली चर्चासत्रे ही आघाडीच्या राजकारणाचा भाग म्हणून सजवली जात. एक प्रकारचा आशाळभूतपणा त्यात असे. संघाच्या कार्यक्रमाला तर मी कधीच हजर राहत नसे. हजेरी लावून त्यांना उत्तेजन देणे माझ्या जिवावर येई. त्यामुळे त्या मंडळींचा माझ्यावर राग असणे स्वाभाविक होते. परंतु माझ्या समाजवादी मित्रांनादेखील माझी भूमिका मान्य नव्हती. माझ्या भूमिकेचा परामर्श घेण्याचे ठरवून बापूसाहेब पाटलांनी भाषण केले. एखादी व्यक्ती, संघटना, पक्ष आपल्यास ढोंगी वाटला तरी आपण तिच्यावर बहिष्कार टाकता उपयोगी नाही. बाबांना मला सांगावयाचे आहे की,... या ओघात त्यांनी सरसंघचालकाचे नाव घेतले. त्यांचे भाषण संपले आणि त्या रात्रीपासून पुढे-५-६ दिवस जेलमधील वातावरण एकदम बदलून गेले. बापूसाहेब पाटलांची संघजन व पतित पावनांनी प्रेतयात्रा काढली. त्यांच्या खोलीवर निषेध मोर्चे गेले, त्यांना हाताळण्याचा प्रयत्न झाला. स्वत: बापूसाहेब साठीला पोचलेले व हृदयविकाराचे पेशंट, त्यांनी सरसंघचालकांना भेटून खुलासा केला, खेद प्रदर्शित केला. शेवटी जेल व्यंवस्थेने त्यांची बरॅक बंद केली व संरक्षक बसवले.

अपप्रचाराची हातोटी

संघाच्या परमतअसहिष्णुतेच्या अनुभव प्रत्येक जेलमध्ये आलेला असेल नाशिक जेलमध्ये असेच प्रकार घडले. साध्यासाध्या गोष्टीत हमरीतुमरी व शक्तीबलाचे प्रदर्शन करणे हा त्यांचा ठरलेला खाक्या. प्रचार करण्याची एक विलक्षण हातोटी त्यांनी आत्मसात केलेली आहे. फक्त वरुन आलेला आदेश मानणार.

तीच निष्ठा व शिस्त

बंगलोर जेलमध्ये खासदार मधू दंडवते यांनी दोन व्याख्याने दिली. त्या व्याख्यानांतील संदर्भरहित वाक्य उचलून त्यांना न कळवता एक परिपत्रक तयार करण्यात आले व ते हिंदूस्थानभरच्या जेलमध्ये पाठविण्यात आले. आम्हाला कळेना की संघाबद्दल दंडवत्यांच्या विचारात एवढा पालट कसा झाला? शेवटी आमच्या समाजवादी मित्रांनी दंडवत्यांवर बंगलोर जेलमध्ये लिहिले. दंडवत्यांनी आपण असे न म्हटल्याचा खुलासा केला. परंतु संघजनाचा विश्वास त्यांच्या वरुन आलेल्या फतव्यावर. संरसंघचालकांच्या षष्ठ्यब्दी समारंभात समाजवादी पक्षाच्या नेत्यांनी भाषण केले व श्रीमान देवरसांचा गौरव केला.संघाच्या वरिष्ठांनी पाहिलंत संघ बदलला का?.. संघाकडे पूर्वग्रहदूषित नजरेने पाहणारे बदलले.... अशी सुरावट निरनिराळ्या जेलमध्ये कर्णापकर्णी पसरवली. अनेक समाजवादी स्थानबध्दांनी

याबद्दल विचारणा केली.

काही संघीयांबरोबर अनेक विषयांवर अधूनमधून चर्चा होई. एकदा मी विचारले महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचा त्रास तुम्हाला होत नाही का? त्याने सांगितले 'त्याचा काही परिणाम होत नाही. आमची कार्यपध्दती फार वेगळी आहे. जेथे शाखा काढावयाची तेथे आम्ही आधी तालमीत जायला सुरुवात करतो. मग हळूहळू इतर व्यायामपट्टू पहिलवानाबरोबर परिचय वाढवायचा, त्यांना रोज उठवायला जायचे तालमीच्या व्यवस्थेत, मारूतीच्या पूजेत लक्ष घालायचे. हळूहळू रामदास, विवेकानंद यांचे फोटो लावायला प्रवृत्त करायचे, त्यांच्यापैकी काही जणांना शाखेवर आणण्याचा प्रयत्न करायचा, भजनी मंडळात भाग घ्यायचा, एखाद्या संघीय प्रवचनकाराला मुद्दाम पाचारण करायचे शेवटी ग्रुप जमला की शाखा सुरु करायची. गोरक्षा अभियान, नवरात्रोत्सव, गणपती उत्सव इ. सामुदायिक हिंदु उत्सव साजरे करण्यासाठी लोकांना प्रवृत्त करायचे. जनता पक्षाच्या विजयानंतर सत्यनारायण महापुजा व जनता मारुतीची स्थापना जनता पक्षाच्या वतीने करण्यात आली. !'

याच कार्यकर्त्याने स्वत:च्या गावात मुसलमानांना कसा धडा शिकवला याचे रसभरीत वर्णन करुन सांगितले.

ब्राह्मणी संस्कृतीची जपवणूक

गावात हिंदू-मुस्लिम दंग्याचा कधीच इतिहास नव्हता. परंतु एकदा गावात गाय मारल्याची आवई उठली. 'मुसलमानांनी गाय मारली' असे समजताच जाब मागण्यासाठी संघजन मुस्लिम मोहोल्यात गेले आणि खाटकाला विचारले, खरे सांग तुला क्षमा करु, ...पण तो कसला ऐकतोय. मुसलमानच तो. मग चांगला धडा शिकवला. परत गाईला कधी हात लावशील तर शपथ !

हे करणारा कार्यकर्ता एका माध्यमिक शाळेत शिक्षक आहे आणि तरुण आहे. आक्रमक हिंदुत्ववादाचे त्याला जबर आकर्षण.

दुसऱ्या एक कार्यकर्त्याने माझ्याशी बोलताना तर कमालच केली. काही दिवस माझ्या शेजारच्या खोलीत ते राहत होते. त्यांचे घराणे काही वर्षापूर्वी उत्तरेतून महाराष्ट्रात आलेले ते म्हणाले, बाबा आढाव आप कहते है-सहि मामलेमें कहाँ जाय तो हम इन पूना बम्बईवाले बम्मनोंको बम्मनहीं नही मानते!....

मला मोठं आश्चर्य वाटले. मी विचारले ते कसे काय? त्यावर त्यांनी स्वत:चे जानवे काढून मला दाखवले आणि म्हणाले, ये देखिएगा मैं कान्यकुब्ज

ब्राह्मण हूँ। कनोजी और शरयूपारीन, आपको पता होगा इन दो शाखोंमें कान्यकुब्ज शाखा श्रेष्ठ द्विजशाखा मानी जाती है ! हम लोक शिखाधिकारी है ! ...शिखा याने ए देखिए.....

त्यांनी जानव्याच्या गाठीत पुढे आलेले दोराचे टोक मला दाखविले. ए पहनने का इधर के बम्मनों को अधिकार नहीं !

याला काय म्हणावे ?

मुसलमानाबद्दल त्याची मते भलतीच कडवी होती. अशा अनेक आठवणी सांगता येथील. हिंदुराष्ट्र, हिंदूसंस्कृती, हिंदू संघटना या शब्दाच्या मागे संघाला नेमका कोणता अर्थ अभिप्रेत आहे हे यातून स्पष्ट व्हावे.

सनातनी, ब्राह्मणी संस्कृतीची ही पध्दतशीर जपणूक आहे. आक्रमक राष्ट्रवादाची त्याला झालर आहे. नीतिशून्य आचार व कर्मकाण्ड यांचे स्तोम माजविण्यात यांचा सारा पुरुषार्थ खर्ची पडतो. जयप्रकाश नारायणांनी 'जानवे तोडा' म्हटले की यांच्या तळपायाची आग मस्तकाला जाते.

अस्पृश्यता प्रश्नी तोंडी लावण्यापूरती सहानुभूती

संघाच्या संघटनात्मक बैठकांची पध्दत फारच साचेबंद असावी. एखाद्या विषयांवर वरुन झालेले निर्णय खालपर्यंत येतात. एकचालकानुवर्तित्वाची पध्दती रुढ झालेली आहे. संघाच्या धोरणात्मक बैठकी फार गुप्त असत. तुरुंगवासाच्या काळात श्रीमान देवरसांनी राज्यकर्त्यांच्या बरोबर पत्रव्यवहार केला, परंतु यापैकी एकाहि पत्राची साधी प्रतदेखील आत पाहावयास मिळाली नाही. स्वत: देवरस अशा बाबतीत अगदी कानावर हात ठेवीत.

संघाला इतिहासात वावरायचे आहे स्पष्ट आहे. या देशापुढे असलेल्या ज्वलंत प्रश्नांकडे संघजनांना सरळसरळ डोळेझाक करावयाची आहे. राजकारणाशी आमचा संबंध नाही हे त्यांचे ठरीव उत्तर आहे. हिंदुत्व हा एकच विषय सदासर्वकाळ त्यांच्या डोक्यात घुमत राहतो. हिंदूत्वाचा अर्थही अगदी मर्यादित, ब्राह्मणी संस्कृतीचे कर्मकाण्ड हा यांचा कार्यक्रम, अस्पृश्यता, जातिव्यवस्था, आदिवासी प्रश्न, स्त्रीदास्य, आर्थिक विषमता असल्या प्रश्नाबाबत फक्त तोंडी लावण्यापुरती सहानुभूती. तीही आणीबाणीच्या धाकांतून निर्माण झालेली; आणीबाणीच्या धाकापायी अनेकजण मोठ्या चमत्कारिकपणे वागत. तुरुंगात सरकारी गुप्तहेर आहेत अशी बातमी समजल्यानंतर अनेकजण सावधपणे वागू लागले. कोणत्या कार्यक्रमात हजर राहावे व न राहावे, हे आपले नाव सरकारकडे जाईल का? याचा अंदाज घेऊन ठरायचे ?

आणीबाणीनंतरचे सोहळे

आता आणीबाणी संपली. मिसा कायद्यातुन सुटका झाली. केंद्रस्थानीच्या काँग्रेस सरकारचा पराभव झाला. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे धाक संपला. धाक संपल्याबरोबर सरसंघचालकांची वक्तव्ये प्रसिध्द होऊ लागली आहेत. दि. २१ मार्च ७७ ला संघजनांची व सरसंघचालकांची येरवडा कारागृहातून मुक्तता झाली. त्या दिवशी पुण्यात जनता पक्षाच्या विजयसभेत त्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. त्या दिवसापासून सरसंघचाकांचा सत्काररुपी अश्वमेधाचा वारु भरतखंडात सर्व दिशांनी दिग्विजय प्राप्त करीत, नवेनवे मनोप्रदेश जिंकीत भराऱ्या मारीत आहे. या दिग्विजयी दौऱ्याची वर्णने वर्तमानपत्रे, साप्ताहिके, आकाशवाणी, दूरदर्शन इ. विविध माध्यमातून जनतेपर्यंत पोचत आहेत. प्रचाराच्या बाबतीत संजय गांधीनाही बाळासाहेबांनी मागे टाकले आहे. फरक एवढाच की त्यावेळी सेन्सॉरशिप होती ती आता नाही. सरसंघचालकांना कोठे सहस्त्र सुवासिनींनी ओवळावे तर कोठे पाच पाच तोफांची सलामी दिली जावी. कोठे नागरिकांच्या वतीने पुंष्पवृष्टी व्हावी तर कोठे गजान्तलक्ष्मीच्या प्रतिकाने, हत्तीने ससंघचालकाच्या गळ्यात अलगद पुष्पमाला घालावी आणि हे सारे सोहळे अगदी उत्स्फूर्त, उत्कट, विराट प्रेमजनसागराने उचंबळून केलेले !!

सरसंघचालक कोठेही जावोत. स्थानकावर स्वागत, नंतर विशाल मिरवणूक, मार्गावर कमानी व जनतेच्या झुंडी, जाहीर सत्कार सभा आणि वार्ताहर परिषद. कार्यक्रमाचे पंचरंगी रुप रोज प्रसिध्द होते. एवढे नव्हे तर जागोंजाग विशेषांक निघतात. त्यात त्यांचा गौरव असतो. अलिकडे अनेक मान्यवर व पूर्वाश्रमीचे टीकाकार आता बाळासाहेबांविषयी साखरेच्या पाकात लेखणी बुडवूनच लिहू लागले आहेत. संघजनांनाही नवे नैतिक बळ प्राप्त झाले आहे. शाखाकार्य मोठ्या उमेदीने पुन:श्च सुरु झाले आहे. 'जितं मया'या भाषेत सरसंघचालकापासून संघ स्वयंसेवकापर्यंत सर्वजणू बोलू लागले आहेत. दिल्लीला रामलीला मैदानांवर झालेल्या जाहीर सभेत सरसंघचालक म्हणाले 'लोकशाहीविरुध्द हुकुमशाही या झगड्यासाठी श्री जयप्रकाश नारायण व राष्ट्रीय स्वयंसेवकसंघ हे उभे ठाकले.'

संघाचा वीस कलमीला पाठिंबा

स्वगौरवाचा हा डिंडीम सर्वत्र गाजतो आहे. सरसंघचालकांचा हा दावा खरा आहे काय? आणीबाणीच्या काळात मिसा कायद्याखाली स्थानबध्द केलेल्यात

संघजनांची संख्या मोठी होती व सत्याग्रहातही संघाच्या स्वयंसेवकांचा मोठा भरणा होता ही वस्तुस्थिती आहे. यापैकी अनेक संघजनांचे असे मत होते की देशात चाललेल्या आणीबाणीविरोधी लढ्याशी व तत्पूर्वी विरोधी पक्षांनी केलेल्या आंदोलनाशी आपला काहीही संबंध नसताना आपल्याला तुरुंगात डांबले आहे. काहींचे तर आणीबाणीच्या राज्याला समर्थनच होते. जयप्रकाश नारायणांनी मिलिटरीला चिथावणी दिली, असे ते बौध्दिकांतून तुरुंगातदेखील सांगत. इंदिरा गांधी व संजय गांधी यांच्या राजकारणाला विरोध असण्यासारखे तत्वत: मतभेद त्यात काहीच नव्हते. संजय गांधीचे कम्युनिस्टविरोधी, मुक्त अर्थव्यवस्थेचे पुरस्कार करणारे, एक चालुकानुवर्तित्ववादी विचार संघाला मान्यच होते. इंदिरा गांधीच्या २० कलमी कार्यक्रमाला व राजकारणाला संघाचा पाठिंबाच होता, ही विचारधारा संघजनात बलिष्ठ होती.

पुण्याच्या, संघाच्या समजल्या जाणाऱ्या दैनिक तरुण भारताने संजय गांधीना उचलून धरण्यांचा आटोकाट प्रयत्न केलेला आहे. डोक्याला तिढा एवढाच होता की बाईंनी २० कलमी कार्यक्रमांसाठी संघाचे सहकार्य न स्वीकारता संघबंदी का घातली? संघवृक्षावर एकसारखी कुऱ्हाड का चालवली? संघावरच नव्हे, संघजनांच्या शिक्षण संस्थांवरही धाडी घातल्या. अगदी पाळेमुळे खणून काढण्याचा प्रयत्न केला. बिचारे संघजन यामुळे अस्वस्थ होत घायकुतीला येत. त्यांची वैचारिक फरफट विलक्षण केविलवाणी दिसे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा व राजकारणाचा काहीही संबंध नाही. संघाला या देशातील यच्चयावत हिंदू संघटित करावयाचा आहे. येथे सनातन, पुरातन, हजारो. वर्षांचे राष्ट्रजीवन आहे आणि ते राष्ट्रजीवन मुख्यत्वेकरुन हिंदूचे आहे. तेव्हा या देशात हिंदूंनी संघटित होणे स्वाभाविक आहे. संघाचे कार्य सांस्कृतिक स्वरुपाचे आहे. संघाविषयी राज्यकर्त्यांच्या मनात आकस आहे. गैरसमज आहेत. बळीचा बकरा करण्यासाठी संघाचे नाव गोवले जाते. पंतप्रधान इंदिरा गांधीच्या मनात संघाबद्दल काही दूषित ग्रह आहेत. (ज्ञानाय दानाय व रक्षणाय, या पुस्तिकेतून, दि. १६-२-७७ पुणे येथे केलेले श्री देवरस यांचे भाषण)

दिल्लीला रामलीला मैदानावर झालेल्या सत्कार सभेत श्री. देवरस म्हणाले 'बंदी व कारागृहवास ही संघाने इष्टापत्ती मानली. संघाबद्दलचे अनेक गैरसमज या कारागृहातील सहवासाने दूर झाले व पुढे पक्षांच्या राष्ट्रीय ऐक्याला ते उपकारक ठरले. या काळात स्वयंसेवकांनी मानहानी पत्करण्यास नकार देवून जी हिंमत दाखवली ती

विलोभनीय होती.

देवरसांचे लोटांगण

संघाच्या कार्यकर्त्यांनी मानहानी पत्करली नाही असे श्री. देवरसांनी म्हणावे याचे आम्हाला सखेदाश्चर्य वाटते. मला इतर ठिकाणची माहिती नाही; परंतु येरवडा कारागृहात व महाराष्ट्रातील इतर कारागृहातून झालेल्या अनेक घडामोडींची माहिती आहे. त्या ठिकाणी अनेक सभा होत, वादविवाद चालत, चर्चा होत. अनेक पत्रांची आवकजावक होई. सरसंघचालक श्रीमान बाळासाहेब देवरस यांनी माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी, माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण, विनोबाजी भावे, संजय गांधीचे काही निकटवर्तीय इ. मंडळींच्याबरोबर काही पत्रव्यवहार केलेला आहे. दिल्लीला झालेल्या वार्ताहर परिषदेत या पत्रापैकी माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना पाठविलेल्या दोन पत्रांची कबुली बाळासाहेब देवरसांनी दिलेली आहे आणि त्या पत्रांच्या प्रती वार्ताहरांनी पाहिल्याही असाव्यात. बाळासाहेबांनी, इंदिरा गांधीच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतनाचे पत्र पाठवले व सर्वोच्च न्यायालयात इंदिरा गांधीनी निवडणूक खटला जिंकल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारे पत्रही बाळासाहेबांनी पाठवलेलं आहे.

वाढदिवसाला कोणी अभिष्टचिंतन केले तर त्याबद्दल कुणाला दूषण लावता येणार नाही; परंतु मन मानेल तशी घटना दुरुस्ती करून सुप्रीम कोर्टात स्वत:चा विजय मॅनेज करून घेण्याचे पापकर्म बाईंनी केले असताना त्यांचे अभिनंदन कशासाठी? तुरुंगवासाच्या सर्वकालात सरसंघचालक स्वत: इंदिरा गांधीच्या बरोबर संवाद साधण्यासाठी, त्यांची भेट मिळविण्याच्या प्रयत्नात होते. माझ्या माहितीप्रमाणे सरसंघचालकांनी यासाठी अनेकांची मनधरणी केलेली आहे. महाराष्ट्राच्या माजी मुख्यमंत्र्यानांही त्यांनी पत्र पाठविले. फेब्रुवारी १९७६ मध्ये इंदिरा गांधी मुंबईत येणार होत्या त्यावेळी त्यांची भेट घडावी म्हणून बाळासाहेबांना येरवडा कारागृहातून आजाराच्या निमित्ताने मुद्दाम मुंबईच्या सेन्ट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले होते. शंकरराव चव्हाणांच्यामार्फत इंदिरा गांधीची भेट व्हावी न जमल्यास किमान शंकरराव चव्हाणांची तरी भेट व्हावी यासाठी जनसंघाचे बाहेर असलेले एक आमदार खटपटी करीत होते. या खटपटीला यश आले नाही हा भाग वेगळा. शंकरराव चव्हाणांची खात्री पटावी म्हणून कित्येक दिवस प्रयत्न चालले होते. या प्रयत्नांत शासनाला अंडरटेकींग लिहून देण्याचा एक भाग सर्व तुरुंगवासियांना माहीत आहे.

अंडरटेकिंगचे नमुने

श्री..................स्थानबध्द वर्ग............कारागृह, प्रतिज्ञेवरुन लिहून देतो, माझी सुटका केल्यास अंतर्गत सुरक्षा व सार्वजनिक शांततेस बाध येईल असे कोणतेही कृत्य मी करणार नाही. तसेच जीवनावश्यक वस्तूंबाबतच्या व्यवस्थेत बाधा येईल अशा रितीने वागणार नाही. तसेच मी कोणत्याही बेकायदेशीर कृत्यात भाग घेणार नाही. तसेच चालू आणीबाणीत बाध येईल अशा कोणत्याही कृत्यात मी भाग घेणार नाही. I shall not indulge in any activity which is prejudical to the present emergency.

महाराष्ट्र शासनाने तुरुंगातील राजकीय स्थानबध्दांकडून सशर्त सुटकेसाठी एक अंडरटेकिंग लिहून मागितले. संघ जनसंघाच्या स्थानबध्दांनी अशा अडरटेकिंग वर सह्या करण्याचा परस्पर निर्णय घेतला तुरुंगात यामुळे बरीच अस्वस्थता वाढली. अंडरटेकिंगवर सह्या केल्या जावू नयेत यासाठी समाजवादी पक्षाचे सर्वश्री बागाईतकार, बाबुराव सामंत, दशरथ पाटील इ. मंडळी जनसंघाचे आमदार रामभाऊ म्हाळगी यांना भेटण्यास गेली होती. रामभाऊंनी असे अंडरटेकिंग लिहून देण्याचा निर्णय संघ व जनसंघाबाहेरच्या उच्च पातळीवरील नेत्यांनी घेतला आहे असे सांगितले. इतकेच नव्हे तर हा अंडरटेकिंगचा फॉर्म्युला बाहेरच्या काही मंडळींनी मुख्यमंत्र्यांच्या बरोबर बोलूनच ठरवला होता अशी माहिती समजली. अंडरटेकिंग वर सह्या करणाऱ्यांपैकी फार थोड्या जणांना सोडलं ही गोष्ट उघड आहे. माजी मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण इतक्या क्षुद्रतेने का वागले हे कळणे अवघड आहे. शरणागतांना मुक्त न करण्यात त्यांनी काय साधलं हे त्यांनाच ठाऊक ! ह्यावेळी हेही सांगितले पाहिजे की शिरुभाऊ लिमये, धुळ्याचे दशरथ पाटील यांच्यासारख्या स्वातंत्र्य सैनिकांनी अशा अंडरटेकिंगवर सही करण्यास नकार दिला. इतकेच नव्हे तर आमच्यासारख्या स्वातंत्र्य सैनिकांचे अंडरटेकिंग मागून अपमान करण्याचा तुम्हाला काय अधिकार असा सवाल त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्रातून विचारला. शिरुभाऊंच वय आता ७० वर्षांचे झाले आहे.

संघ, जनसंघीयांनी अशा तऱ्हेचे 'अंडरटेकिंग'लिहून देऊ नये यासाठी बाहेरच्या संघर्ष समितीचा आदेश श्री. एस. एम. जोशी यांच्यामार्फत आत पाठविण्यात आला. या आदेशाची उपेक्षा झाली. अशा तऱ्हेचा निर्णय संघर्ष समितीत झालेलाच नाही असा कांगावा जनसंघाच्या मंडळींनी सुरु केला. मला वाटतं शेवटी जयप्रकाश नारायणांचे पत्र आता पाठविण्यात आले. नाशिक जेलमध्ये

PUNE
MOB.: 9422691399

समाजवादी मंडळींनी 'अंडरटेकिंग'लिहून द्यावयाचे नाही असा निर्णय घेतला. या मुद्यांवर संघ, जनसंघ व समाजवादी अशा चिरफळ्या पडल्या.

संघाचे एक ज्येष्ठ नेते ब. ना. उर्फ बाबा भिडे यांची संघजनांच्यापुढे बौध्दिके होत. ते आपल्या भाषणांतून आणीबाणीचं समर्थनच करीत आणि आणीबाणीविरोधी लढ्याशी काहीही संबंध नाही असं आवर्जून सांगत. स्वत: बाळासाहेब देवरस हेही म्हणत, सरकारने संघबदी घातली नसती तर संघाचे स्वयंसेवक एवढ्या मोठ्या संख्येने सत्याग्रह करुन आत आलेच नसते.

काश्मिरातली बैठक

याच काळात दिल्लीच्या पातळीवर काही खटपटी चाललेल्या होत्या. संजय गांधी, इंदिरा गांधी यांचेकडेही मध्यस्थीचे प्रयत्न झाले असावेत. श्री. विनोबाजी भावे यांचे मार्फत प्रयत्न केल्याचे श्रीमान बाळासाहेब देवरस यांनी मान्य केलेलेच आहे. त्याही पुढे जावून काश्मीरात एक बैठक भरविण्यात आली व तीत संघाच्या कार्यपध्दतीत बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता अशी माहिती तुरुंगातच आम्हाला समजली. सरसंघचालकपदाच्या ऐवजी निवडणुकीच्या मार्गे अध्यक्षपद व संघामध्ये अहिंदूंना प्रवेश देण्याचे ठरवल्याप्रमाणे संजय गांधींना कळविण्यात आले. दिल्लीचे जनसंघाचे कार्यकर्ते हसंराज गुप्ता यांचे नाव कामी घेतले जाते. या सर्व बाबतीत नेमकं काय घडलं याची माहिती मिळविण्याचे काम निश्चितपणे करता येईल.

रा. स्व. संघाबद्दल एवढे लिहिण्याचे कारण म्हणजे आणीबाणीविरोधी लढ्यातील विजयाचे सर्वश्रेष्ठ भागीदार आपणच असल्याच्या आर्विभावात सरसंघचालक सर्वत्र बोलत आहेत ही बाब मनाला खटकणारी आहे.

'अंडरटेकिंग'चा मामला पुढे काही दिवसांनी मागे पडला; कारण शंकरराव चव्हाणांना ते परवडले नसावे. त्यांनी पुढे मेमोरंडम नावाची चीज पुढे आणली. सशर्त सुटकेचाच हा एक अपमानास्पद मामला होता. त्याचा नमुना पढीलप्रमाणे.

Sir,

Your case for detention has been reviewed by this Govt. and it has been decided that the detention should be revoked subject to the condition that, you shall not participate in activities prejudicial to the present emergency and subject to good behavior. You are requested to

please note it.

yours faithfuly
sd/
Section Officer Home Dept.
Govt. of Maharashtra

Copy to (1) the Superintendent Yerawada Central Prison, (2) He should serve the original on the detenue and obtain his acknowledgement and return the same to the Govt. In case, the detenue refuse to acknowldge the receipt of the communication the case may be referred back to the Govt. and necessary orders awaited. the detenue should not be release in the meanwhile.

Desk Officer, to Govt. of Maharashtra Home Dept.

अशा प्रकारच्या कारवाईलासुध्दा अनेक जण बळी पडले. संघजनापैकी अनेकांनी कायदेशीर पवित्रा घेतला आणि अशा तऱ्हेने लिहून दिले तर काय बिघडणार आहे अशीही चार्चा झाली. शेवटी व्याधीग्रस्त, अपंग, वयोवृध्द व ज्यांनी समाजासाठी पुढे काहीही करावयाचे नाही असे ठरविले त्यांना मोकळीक देण्यात आली. हा निर्णय देखील संघ, जनसंघाच्या मंडळींनी परस्पर घेतला. हा इतिहास काहीसा कटु असला तरी संघाची भूमिका स्पष्ट होण्याच्या दृष्टीने जाहीर होणे आवश्यक वाटते.

जमाते इस्लामीच्या मंडळींना शासनाने बरेच अगोदर सोडून दिले. त्यांच्यापैकी अनेकांनी अंडरटेकिंग लिहून दिलेले आहे. ज्यांनी लिहून देण्याचे नाकारले त्यांनाही संघाप्रमाणे सोडून देण्यात आले. शासनाची जातीयवादी भूमिका यातून स्पष्ट व्हावी.

संघ आणि बदल

संघाने आपले धोरण व भूमिका बदलली का?

या प्रश्नाला ते फार खुबीने उत्तर देतात. त्यांच्या मते,'संघाच्या भूमिकेबाबत बुध्दिवंतांनाच विसर पडलेला आहे. संघाविषयी अपप्रचार होतो. व गैरसमज मुद्दाम पिकविण्यात येतात.' अहिंदूंना प्रवेश देणार का? त्याला उत्तर देताना ते म्हणतात, हिंदू समाजाचे घर ठीकठाक होत नाही तोपर्यंत इतरांना सामावून घेण्याचा प्रयत्न यशस्वी होणार नाही. मुसलमानांना संघात प्रेवश देण्याची जितकी तळमळ सध्या व्यक्त होत आहे ती सर्व हिंदूनींच व्यक्त केलेली तळमळ आहे. मुसलमानांना अशी तळमळ लागली आहे की नाही ते आधी तपासून घेतले पाहिजे. त्यांना संघात यावेसे मनापासून वाटत असेल तर संघात चालू असलेल्या

(प्रतिमापूजन, मूर्तिपुजा) गोष्टी त्यांनाही चालवून घ्याव्या लागतील.

'हिंदू' या शब्दाची श्री. गोळवळकर गुरुजींनी केलेली व्याख्याच बाळासाहेबांना अभिप्रेत आहे आणि ते म्हणतात की, भारत हे त्या अर्थाने हिंदूंचे राष्ट्र आहे. श्रीमान बाळासाहेब देवरस तुरुंगातील वास्तव्यात श्री. गोळवळकर गुरुजींचे नाव क्वचितच घेत, परंतु सुटका झाल्यापासून देवरसांनी आपली भूमिका बदलली दिसतेय. आणीबाणी व मिसा कायदा आणि यांच्या धाकाने संघाच्या भूमिकेत बदल करण्यास तयार झालेली मंडळी, आणीबाणी व मिसा बंदी दूर होताच पुन्हा मूळ पदावर आलेली आहेत. श्री. देवरस पुन्हा मूळ पदावर आलेले आहेत. श्री. देवरस पुन्हापुन्हा सांगतात, 'संघ राजकारणापासून अलिप्त आहे व यापुढे तो तसाच राहणार आहे. याचा अर्थ संघ सत्तेच्या आणि निवडणूकीच्या राजकारणापासून दूर राहणार आहे. सामाजिक परिवर्तनासाठीच तो गेली ५० वर्षे काम करीत आला आहे. त्याने माणूस बदलण्याचा, घडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानं घडविलेली माणसं कोणता चमत्कार घडवू शकतात, हे नुकतेच देशाला आणि जगाला पहायला मिळाले आहे. विभिन्न राजकीय विचारसरणीचे लोक एकत्र आणण्याचे काम आम्हाला करता आले.' ही सारी मुक्ताफळे फार गंभीर स्वरुपाची आहेत.

सरसंघचालक देवरस, दिल्लीचे जामा मशिदीचे शाही इमाम, ही मंडळी आज एका आवाजात बोलतात. भारतासारख्या इहवादी राष्ट्रात धर्माची सत्ता आणि क्षेत्र नेहमीच मर्यादित होणार. देवरसांना व इमामांना हा इहवाद अमान्य दिसतो. शासनावर, राजकारणावर, सर्व समाजावर अधिसत्ता गाजविणारी धर्मसत्ता तर त्यांना अभिप्रेत आहे.

कार्यक्रमशून्य

गोळवळकर गुरुजींनी समान नागरी कायद्याला पाठिंबा दिला नाही. इतकेच नव्हे तर मुस्लिमांच्या वैयक्तिक कायद्यातही शासनाने ढवळाढवळ करु नये असे त्यांचे मत होते. हिंदू स्त्री-मुक्तीबद्दल त्यांची मते वेगळी कशी असणार? श्रीमान बाळासाहेब देवरसांची भूमिका याहून वेगळी आहे असे कोणत्या आधारावर म्हणता येईल? अस्पृश्यता हिंदूधर्मावरील कलंक आहे. वर्ण, जातिव्यवस्था जीर्ण, विकीर्ण, टाकावू झालेली आहे असे नुसते म्हणायचे, परंतु कार्यक्रम ? शून्य. राष्ट्रीय प्रवाह, राष्ट्रीय प्रवाह म्हणजे नेमके काय? मुसलमान राष्ट्रीयप्रवाहात कसे येतील याची चिंता करायची; परंतु १२-१३ कोटी अस्पृश्यांची राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्याची उर्मी कशी सफळ करायची? मुसलमानांना राष्ट्रीय मोजमाप लावणारे हे होण? 'विसरा

आणि क्षमा करा'या धोरणाच पुनरुच्चार हेच करणार ! राजकारण नको म्हणत राजकारणावर हुकूमत गाजविण्याचे हे नाटक वेळीच थोपवले पाहिजे.

प्रस्तुतचा लेख हा काहीसा वादविषय होईल याची मला जाणीव आहे. सध्याच्या राजकीय उलथापालथीत माझ्यावर काही हेत्वारोप होण्याचाही संभव आहे. माझ्या काही मित्रांना हे रुचणार देखील नाही. तसे काहींनी बोलूनही दाखवले आहे. जनता पक्षात असे मित्र बरेच आहेत. या विषयावर तुरुंगात देखील आमचे मतभेद होते. रा. स्व. संघ हळूहळू बदलतोय असे त्यांना वाटते व सध्याच्या राजकीय गटबंधनाच्यादृष्टीने त्यांना ही चर्चा अप्रयोजक वाटते. महाराष्ट्र काँग्रेसच्या हातात यामुळे आयतेच कोलीत मिळेल असेही काहींना वाटते. मला वाटते इतका तात्पुरता विचार करुन भागणार नाही. जयप्रकाशांच्या संपूर्ण क्रांतिच्या नाऱ्याचा मग नेमका अर्थ काय? कोणत्या शक्तींच्या आधारावर या देशाचे राजकारण चालणार? शोषित, दलित शक्तींचा विचार करुनच राजकारण चालले पाहिजे. काँग्रेसजनांना फारसे उपयोगी पडणार नाही. कारण संघाला नैतिक आधार मिळवून देण्याचे काम स्वत: इंदिरा गांधींनी व त्यांच्या सहकाऱ्यांनीच केलेले आहे. देशाच्या राजकीय जीवनात काही गोष्टी 'अपरिहार्य' झाल्याचे कारण मुळी काँग्रेसचे राजकारण होय. देशाला कित्येक वर्षे मागे रेटण्यात आलेले आहे.

पुरोगामी शक्तींच्या एकजुटीऐवजी आणिबाणी व मिसा राज्य विरोधात अनेक गोष्टी अपरिहार्य म्हणून स्वीकाराव्या लागल्या आहेत. महाराष्ट्रात उच्चभ्रु वर्गाविरुध्द, ब्राह्मण वर्गाविरुध्द थोडा आवाज काढला की काही मंडळींना गुदगुल्या होतात. मराठ्यांविरुध्द बोलले की ब्राह्मणवर्गातील काही मंडळींना आनंद होतो. आजच्या राजकीय गटबंधनातील हा सामाजिक कटू भाग आहे. पण त्याला भिऊन कसे भागेल? बहुजनांचे राज्य म्हणविणारे दलितांना कितपत न्याय देतात? हाही प्रश्न म. फुल्यांचा सत्यशोधकी विचार याच निकषांवर काहीसा पराभूत झाला. परंतु ते सत्यशोधनाचे काम नेटाने करावेच लागणार आहे. आणि आम्ही ते करण्याचा मनोमन प्रयत्न करीत आहोत. राजकारणात समाजकारणात कोणी बदलणारच नाही असा माझा दावा नाही. असे बदल झाले तर आनंदाची गोष्ट आहे. परंतु शाब्दिक बदलांनी माझ्या सारख्यांचे समाधान होणे अवघड आहे. त्याचा प्रत्यय आचारांतून यावा. ते जोपर्यंत होत नाही तोपर्यंत बदल झाला असे म्हणणे योग्य ठरणार नाही.

●●●●

संघापासून सावध

दोन वर्षापूर्वी 'संघाची ढोंगबाजी'ही पुस्तिका प्रसिध्द झाली. जनता पक्षाच्या भरभरटीचा तो काळ होता. लोकसभा व विधानसभांच्या निवडणूका जिंकून राजयोगाला सुरुवात झाली होती. आणीबाणी व एकाधिकारशाही यांच्या विरोधांतून जन्म पावलेल्या जनता पक्षाला लोकनायक जयप्रकाश संपूर्ण क्रांतीचे हत्यार बनवू पाहत होते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, परिवर्तनासाठी भारतीय जनमानस आसुसलेले होते. 'इंदिरा गांधीच्या' 'गरिबी हटाव' घोषणेला 'संपूर्ण क्रांती' हे जणू प्रत्युत्तर होते. आणीबाणी व हुकूमशाही मार्गांचा अवलंब न करता संपूर्ण क्रांतीचे भव्य स्वप्न साकार होईल अशा आशा जनमानसात पल्लवित झाल्या होत्या.

आणीबाणी व एकाधिकारशाहीचे संकट केवळ कोणा एका व्यक्तीच्या लहरीतून निर्माण झाले असे म्हणणे राजकीय उलथापालथींचा शास्त्रीय विचार करणारांना मान्य होणार नाही. १९७४-७५ सालातील जनसमूहांच्या असंतोषाचे उद्रेक जागोजाग उमटत होते. बेकारी व लोकनियुक्त सभासदांचा भ्रष्टाचार याविरुध्द तरुण वर्ग खवळून उठला होता. बिहार, गुजरात, मराठवाडा येथे तरुणांनी संघटित उठाव केले. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या संपाची जगाच्या इतिहासात नोंद झाली. महागाई, टंचाई, बेकारी, भ्रष्टाचार याविरुध्द खवळलेल्या जनमानसाला आणीबाणी व मिसा हे उत्तर मिळाले. त्या अगोदर सरकारने दंडुकेशाही -दडपशाहीचा वापर करुन पाहिला. जनतेचे प्रश्न सोडविण्यात अपयशी ठरलेल्या सरकारने जनतेला पोलिसांचा बडगा दाखवताच जयप्रकाश नारायणांनी अन्यायाची दाद मागणाऱ्या जनतेवर पोलिसांनी लाठीमार-गोळीबार करु नये, प्रसंगी आपल्या वरिष्ठांची अवज्ञा करण्यासही हरकत नाही असे आवाहन केलेले होते. पाटण्याला काढलेल्या एका मोर्चात जयप्रकाशच पोलिसी लाठीहल्ल्यांतून बालबाल बचावले होते.

आणीबाणी व एकाधिकारशाहीची राजवट संपुष्टात येऊन जनता पक्षाच्या राजवटीला २।। वर्षे झाली. आज लाठीधारी-संगीनधारी पोलीस शिपाईच रस्त्यावर आले होते. देशात पोलिस विरुध्द लष्करी जवान असा प्रसंग निर्माण होताना दिसत आहे. संपूर्ण क्रांतीचे भव्य स्वप्न साकार करण्यासाठी जनता पक्षाचे हत्यार किती बोथट ठरले याचा हा दाहक पुरावा आहे.

'क्रांती' हा एक अर्थाने परवलीचा शब्द आहे. तिला राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक इ. विशेषणे वेळोवेळी लावली जातात. क्वचित लष्करी क्रांती असेही

म्हटले जाते. जयप्रकाशांनी संपूर्ण क्रांतीचा नारा दिला. या शब्दामागचे संदर्भ भारतीय लोकमानसाला ठाऊक आहेत. विषम संधी व विषम न्याय यावर आधारलेल्या वर्णजातीभेद, स्त्री-पुरुष श्रेष्ठत्व व कनिष्ठत्व यांनी बुरसटलेल्या समाजव्यवस्थेच्या जागी समान संधी व समान न्यायावर आधारलेली समताधिष्ठित समाजाची उभारणी करण्याचा आणि तोही लोकशाही मार्गांनी करण्याचा संकल्प लोकनायकांनी केला. कष्टकरी, व दलित जातींनी कर्मविपाकाच्या जंजाळातून आपली सुटका करुन घेतली असली तरी उच्चवर्णियांच्या डोक्यातील जन्माधिष्ठित श्रेष्ठत्व व पावित्र्याच्या अहंकाराची निरगाठ सुटावी म्हणून जयप्रकाशांनी जानवी तोडा अशी हाक दिली.

क्रांती म्हणजे डांगडिंग नव्हे हे समजवण्यासाठी तरुणांना 'हुंडा न घेण्याची ' शपथ दिली. लोकनायकांचा वरदहस्त आपल्याला लाभावा यासाठी कितीतरी युवक संघटना त्यावेळी खटपटीत होत्या. 'संपूर्ण क्रांती' या निर्गुण शब्दसमुहाला ज्यावेळी जानवी तोडण्याचे सगुण रुप आले त्याचवेळी रा. स्व. संघाचे तामिळनाडूतील प्रांत प्रचारक श्रीमान यादवराव जोशी जाहीरपणे म्हणाले, 'जानवी तोडायला आमचा विरोध आहे. जयप्रकाशांनी सांगितले म्हणून काय झाले? जयप्रकाशांना सर्वच काही कळते असे आम्ही मानत नाही !...'जयप्रकाशही पुढे आजारी पडले. जनतापक्षाच्या हत्याराला ही निरगाठ तोडता आली नाही.

बेलछी बेहरामपूर, पंतनगर, मराठवाडा इत्यादी ठिकाणच्या दंगलींनी दलित मन होरपळून निघाले. अलिगढ, जमशेदपूरला मुस्लिम-हिंदू दंगे पेटले. खुनांच्या आकड्याने ऐतिहासिक रेकॉर्ड मोडले. गायरानात शेती करायला गेलेल्या दलितांना 'कंझावला'पाहावयास मिळाले. गेले २-२ ।। वर्षात दलित कष्टकरी जातींच्या वाट्याला काय आले? तरुणांची बेकारी किती हटली? स्त्रीवर्गाचे दैन्य किती कमी झाले.

या प्रश्नांची उत्तरे पेटलेल्या वस्त्या,खून, बलात्कार यातून मिळाली. सर्वहारावर्गाची 'अस्मिता'चिरडून टाकण्यात, त्यांची अवहेलना करण्यात आसुरी आनंद मानणाऱ्यांच्या पुढे लोकशाही शासन नतमस्तक झाले. लोकशाहीतील महागड्या कायद्याव्यवस्थेत न्याय मागणे हा चेष्टेचा विषय बनला. खून पडला...परंतु आरोपींचा पत्ता नाही असे निकाल लागून कोर्टापुढे आरोपी हसत खिदळत 'पुराव्याभावी'कोर्टाबाहेर पडताना जागोजाग दिसू लागले.

या देशातील ३० टक्के दलित भूमिहीनांकडे मातीच्या कणाएवढी देखील

जमीन नाही. ७/१२ च्या उताऱ्यावर पत नसलेल्या या वर्गाने आजवर फक्त बँकांच्या पाट्या पाहिल्या. कर्तबगारीला आलेल्या तरुण पोरांच्या बेकारीमुळे फाटलेल्या संसाराला ठिगळे लावण्यासाठी स्त्रीवर्गाला कोंड्याचा मांडा करावा लागला. उपासमार काबाडकष्टांना सीमा उरली नाही. दारिद्र्य व दैन्याची दृश्ये पाहताना आपल्या नजरेला भोवळ येते आणि भारतीय परंपरेच्या संस्कारामुळे ती नजर तात्काळ निठविते. देखील. जानव्यांच्या निरगांठीचा तो मानसिक परिणाम आहे.

लोकनायकांच्या संपूर्ण क्रांतीच्या स्वप्नाचा असा चुराडा झाला. केंद्र व राज्याच्या राजधान्यांतून सत्तेच्या आघाड्यांचे जुगारी अड्डे बेदरकारपणे सुरु राहिले. हरघडीला नवा डाव! हरली जनता. जिंकले सत्तासंपत्तीचे मालक. गेल्या २॥ वर्षात आर्थिक-सामाजिक विषमता वाढली असे म्हटले तर अतिशयोक्तीचे होणार नाही.

अलिशान राष्ट्रपती भवन सोडून साध्या बंगल्यात राहायला निघालेल्या संजीव रेड्डींना कुठेतरी मांजर आडवे गेले. निरनिराळ्या मंत्र्यांची मग काय तऱ्हा। संपूर्ण क्रांतीच्या मार्गात अशी मांजरे जागोजाग आडवी जावू लागली. स्वत: जयप्रकाशांना जसलोक व एक्सप्रेस टॉवर्सच्या बाहेर पडणे मुश्किल झाले.

संपूर्ण क्रांतीसाठी सज्ज झालेला मोर्चा माघारी वळविण्याची हिकमत यशस्वी झाली. हा मोर्चा तसा संघटित नव्हता. शिकार साधण्यासाठी लागणाऱ्या हाकाऱ्यांचे स्वरुप त्याला आलेले होते. 'बोल जवाना हल्ला बोल' म्हणत जागी झालेली तरुणाई निद्रीत झाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली.

ही हिकमत कोणी केली? कशी केली? का केली? या प्रश्नांची उत्तरे शोधली पाहिजेत. जनता पक्षासारखी राजकीय आघाडी आर्थिक-सामाजिक क्रांती करु शकेल हे राजकीय प्रमेयच मुळी चुकीचे होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडणारे पडित जवाहरलाल नेहरु समाजवादाच्या भाषेतच बोलत होते. स्वातंत्र्याचा प्रत्यय आणून देण्यासाठी भंग्याच्या मुलीला राष्ट्रपतीपदावर आरुढ झाल्याचे स्वप्न महात्मा गांधी रंगवीत होते. आणीबाणीविरोधी लढ्याला दुसरे स्वातंत्र्ययुध्द म्हणतात. या युध्दातही तीच भाषा वापरली गेली. परिवर्तनवादी क्रांती सुखासुखी होईल यावरचा विश्वास२-२ ॥ वर्षात उडून गेलेला आहे. इतकेच नव्हे तर त्या मार्गात अनेक संकटे निर्माण झालेली आहेत. एक भयावह सावट जमा होताना दिसत आहे. परिवर्तनवादी म्हणवून घेणाऱ्या डाव्यांबद्दलच्या विश्वासाला ओहोटी लागलेली आहे. परिवर्तनाची आच मात्र तीव्र बनत आहे. तिचा वेध घेऊन

क्रांतीची वाटचाल कशी करावयाची हा आजचा यक्षप्रश्न आहे. त्या क्रांतीच्या मार्गातील अडीअडचणींचा विचार गंभीरपणे झाला पाहिजे.

या देशातील काही संघटनांना हे प्रश्न अजिबात महत्वाचे वाटत नाहीत. इतकेच नव्हे तर असे प्रश्न आहेत याचे भानही ठेवावेस वाटत नाही. रा. स्व. संघ, जमाते इस्लामी हिंद यासारख्या संघटनांची नावे या संदर्भात घेता येतील. आणीबाणीच्या काळात रा. स्व. संघावर बंदी घालण्यात आली होती. त्यांचे हजारो स्वयंसेवक मिसा कायद्याखाली स्थानबद्द करण्यात आले होते, साहजिकच 'दुसऱ्या स्वातंत्र्ययुध्दाचे'हिरो पद त्यांच्याकडे गेले. जनतापक्षाच्या जडणघडणीत सरसंघचालकांच्या शब्दाचा जबरदस्त 'वट'निर्माण झाला. आणीबाणीच्या काळात विनोबाजी भाव्यांनी उच्चारलेल्या शब्दांचा अर्थ लावण्यासाठी अहमहमिका लागे. अलीकडे २-२।। वर्षात तो मान सरसंघचालकांच्या शब्दांना लाभलेला आहे. वर्तमानपत्रे, आकाशवाणी, दूरदर्शन इ. माध्यमांचा मुक्त वापर करुन श्रीमान बाळासाहेब देंवरसांनी आणीबाणी काळाचे उट्टे भरुन काढले.

रा. स्व. संघ ही 'धर्माच्या पायावर उभी असलेली निमलष्करी राजकीय संघटना'आहे असे म्हटले की संघजन रागावतात. 'राजकीय' शब्दाला त्यांची जोरदार हरकत असते. संपूर्ण क्रांतीच्या महामोर्चात योगदान करावयास सिध्द झालेल्या संघाने स्वत:ला विसर्जित करुन जनता पक्षात दाखल व्हावे ही जयप्रकाश नारायणांची सूचना संघाने लीलया अव्हेरली. पंतप्रधान मोरारजीभाईंनी याच संघाला 'आपले काम करु देत संघाच्या विसर्जनाची गरज नाही'असा निर्वाळा दिला. त्यानंतर 'संघ हळूहळू बदलतोय'हे वाक्य गेले २-२।। वर्षात हजारवेळा ऐकू आले. अच्युतराव पटवर्धनासारख्या क्रांतिकारक देशभक्ताला देखील तसे वाटू लागावे हे केवढे आश्चर्य! ....जनता पक्षाची निर्मिती होईपर्यंत सरसंघचालक श्री. देवरस काहीशा मोघम भाषेत बोलत होते. परंतु जनता पक्षाची राजवट स्थिर झाल्यानंतर त्यांनी सांगायला सुरुवात केली संघ बदलला नाही. संघाकडे पाहण्याचा लोकांचा दृष्टिकोन बदलत आहे. 'आणीबाणीविरोधी लढ्यात संघाचा सिंहाचा वाटा होता.'हे ध्रुवपद गेली २।। वर्षे रोज ऐकायला मिळत आहे.

आणीबाणीविरोधी लढा व रा. स्व. संघाने बजावलेली कामगिरी हा अगदी स्वतंत्र व संशोधनाचा विषय आहे. मला संघाचा दावा मान्य नाही. माझे म्हणणे मी पुराव्यांसह मांडण्यास तयार आहे. माणसे तुरुंगात गेली म्हणजे आपोआप देशभक्त बनतात असा येथे प्रघात पडलेला आहे. स्वत: सरसंघचालकांनी सत्याग्रह केलेला

नव्हता. उलट ते सारखे घोकून सांगत होते. R.S.S. is not connected with these movements ! जयप्रकाश प्रणित चळवळीशी रा. स्व. संघाचा संबंध नाही आणि हे त्यांनी पंतप्रधान इंदिरा गांधीना लिहिलेल्या पत्रातून स्पष्टपणे कळवले आहे. बाईंच्या बरोबर तहाची बोलणी व्हावीत यासाठी आचार्य विनोबा भावे, शंकरराव चव्हाण यांनी मध्यस्थी करावी यासाठी खटपट केली आहे. बाईंच्या नेतृत्वाखाली राष्ट्र उभारणीच्या कार्यात संघस्वयंसेवक सहभागी होतील असे स्पष्ट आश्वासन त्यांनी दिलेले आहे आणि त्याच काळात जयप्रकाश नारायणांनी लढा मागे घ्यावा म्हणून ही मंडळी दबाव आणीत होती. जयप्रकाशांनी नकार दिला ही बाब वेगळी.

आणीबाणीच्या काळात मिसाखाली स्थानबध्द असताना सरकारी अंडरटेकिंग व मेमोरँडमवर सह्या करुन सुटका करुन घेण्याची तयारी बहुसंख्य संघस्वयंसेवकांनी दाखविल्याचे जेल रेकॉर्डवर आजही मौजूद आहे. याबाबतीत एका काँग्रेस खासदाराने राज्यसभेत जनता सरकारला चुकीच्या पध्दतीने प्रश्न विचारला, आणीबाणीच्या काळात स्थानबध्द करण्यात आलेल्यापैकी किती जणांनी अंडरटेकिंग लिहून देऊन सुटका करुन घेतली ?

या प्रश्नाचे एक उत्तर सांगून गृहमंत्र्यांने वेळ मारुन दिली.

वास्तविक प्रश्नकर्त्याने पूर्ण माहिती काढून घेण्यासाठी पुढील प्रश्न विचारायला हवे होते-

१) आणीबाणीच्या काळात किती रा. स्व. संघ कार्यकर्ते स्थानबध्द होते.

२) यापैकी किती जणांनी स्वत:ची सुटका व्हावी म्हणून शासनाला बाँड, अंडरटेकिंग व मेमोरँडम लिहून देण्याची तयारी दर्शविली ? वा सुटकेसाठी अर्ज पाठवले ?

३) यापैकी किती जणांना शासनाने मुक्त केले ?

आणीबाणीत येरवडा जेलमध्ये असताना अंडरटेकिंग वा मेमोरँडमवर सही करण्यास आपण राजी आहात काय ? अशी लेखी विचारणा करणारी सर्क्युलर्स ३-४ वेळा आली होती आणि बहुसंख्य संघजनांनी होकाराच्या बाजूला सह्या केलेल्या मी डोळ्याने पाहिल्या आहेत.

आणीबाणीच्या काळात जेल बाहेरच्या संघजनांनी संघाच्या समर्थनार्थ डझनवारी पुस्तिका छापून घरोघर फुकट पाठवल्या.

१) रा. स्व. संघ आणि धन संग्रह २) संघ आणि राष्ट्रीय एकात्मता ३) संघ, जातीयता आणि अस्पृश्यता मानीत नाही ४) फॅसिस्ट कोण ? राष्ट्रीय स्वयंसेवक संघ फॅसिस्ट आहे का ? ५) संघ आणि राजनिती ६) संघ हिसांचार ७) संघ व भाषिक

वाद ८) संघ बंदीची मिमांसा ९) संघाची राष्ट्रीय भूमिका १०) संघ प्रगती विरोधी आणि विज्ञान विरोधी आहे काय? ११) रा. स्व. संघ सांस्कृतिक संघटन या फॅसिस्ट? १२) Justice Demands - Letters Of Rss Chief. (पंतप्रधान इंदिरा गांधी व आचार्य विनोबा भावे यांना तुरुंगातून पाठवलेली पत्र) यातील बहुसंख्य पुस्तिकांच्या सुरुवातीसच भूमिका या सदरात पुढील मजकुराचा समावेश आहे.

२६ जून १९७५ ला आणिबाणी घोषित झाली आणि वर्तमानपत्रातून मतप्रदर्शनावर कडक निर्बंध लादले गेले. त्यामुळे संघविरोधी प्रचाराला सारे मैदान मोकळे झाले. सरकारी पातळीवरही दृक्, श्राव्य आदि सर्व माध्यमातून संघविरोधी अपप्रचार जोरात सुरु झाला. अशावेळी विविध भूमिका जनतेसमोर स्पष्ट रुपाने मांडणे नितांत आवश्यक झाले आहे. खरोखरी वास्तविकता काय आहे याचा परिचय होऊन प्रत्येकाला परिस्थितीचे योग्य मूल्यांकन करता यावे यासाठी हा प्रयत्न केला आहे.

यातील 'JUSTICE Demands' ही पुस्तिका वाचल्यावरच श्रीमान बाळासाहेब देवरस पंतप्रधान इंदिरा गांधींबरोबर तह करण्यास कसे तयार झाले होते हे लक्षात येईल.

I request you to our best to remove wrong impressions the PM is carrying about the Sangh and Sangh Swayansewaks are released from the jails, The ban imposed on Sangh is lifted and such conditions as will enable the Sangh and swayanesvaks to actively participate in the development programme in various fields increased under the leadership of PM are created.

Praying for your blessings
Yours Sincerely
Madhukar Dattatraya Deoras
Rashtriya Swayansevak Sangh

आणीबाणीच्या काळात पुण्याच्या तरुणभारत पत्राने संजय गांधी विशेषांक काढला होता. साप्ताहिक साधना एकाकीपणे लढत होती. याबद्दल गौरवाचा शब्द तर राहू देत या मंडळींना शासनाबरोबर आतून सहकार्य असल्याचीच शंका होती.

आता २-२।। वर्षानंतर संघाचा प्रचार करण्यासाठी सारी मैदाने खुली झालेली आहेत. देशातील प्रत्येक घडामोडीत सरसंघचालक भाग घेताना दिसत आहेत. देशाची राजधानी दिल्ली का नागपूर? असा गमतीदार प्रश्न लोकसभेत विचारला गेला आहे. तरीही सरसंघचालक राजकारणाचा आरोप माशी झटकावी

इतक्या तत्परतेने झटकून टाकीत आहेत. खरोखर रा. स्व. संघ ही संघटना आहे तरी काय? संघ राजकारण करीत नाही?

महाराष्ट्र राज्याचे जॉइंट कमिशनर श्री. एम. एस. वैद्य, L.L.M. मुंबई यांनी दिलेल्या एका अपीलाचा निकाल बरेच दिवसापूर्वी मला वाचावयास मिळाला. मुंबई विश्वस्त निधी कायद्याच्या (१९५०) कलम १९ अन्वये रा. स्व. संघाच्या आर्थिक व्यवहाराची चौकशी केली जावी अशी मागणी नागपूरचे एक जुने संघ कार्यकर्ते डॉ. एम. डी. कामदार यांनी केलेली होती.

डेप्युटी चॅरिटी कमिशनरांनी दि. २५-११-७२ रोजी नागपुरच्या दैनिक लोकमत मध्ये जाहीर नाटीस प्रसिध्द करुन चौकशीचा इरादा जाहीर केला. या नोटीशीला श्री. बाळासाहेब देवरस यांनी लेखी हरकत घेऊन रा. स्व. संघ हा सार्वजनिक विश्वस्त निधी आहे हे विधान अमान्य केले. त्यांच्या मते संघ हा सार्वजनिक विश्वस्तनिधी नाही त्याहीपेक्षा तो धार्मिक व धर्मदाय विश्वस्तनिधी नाही. या दाव्यात पुढील उल्लेख आहे.

It was conteded at the stage of arguments before the Deputy Charity Commissioner that the organisation had all along aimed at patriotic activities that were alin to the political activities.

डेप्युटी चॅरिटी कमिशनरांच्या पुढे केलेल्या युक्तिवादाच्या एकावेळी संघटनेच्यावतीने असे सांगण्यात आले की, संघटनेने देशभक्तीपर उपक्रमांचे ध्येय ठेवले आहे. ही कामे राजकीय उपक्रमसदृश्यच होती. इंग्रजी विधानाचे मी वरीलप्रमाणे मुक्त भाषांतर केलेले आहे. सार्वजनिक विश्वस्त निधीच्या कायद्यातून पळवाट काढण्यासाठी संघाने केलेली ही शाब्दिक सर्कस पुरेशी बोलकी आहे. डेप्युटी चॅरिटी कमिशनरांनी संघाच्या वतीने केलेला युक्तिवाद मान्य केला. संघाची उद्दिष्टे राजकीय सदृश्यच असल्याचा निर्णय दिला. डेप्युटी चॅरिटी कमिशनरांच्या या निर्णयाविरुध्द डॉ. कामदारांनी जॉइंट चॅरिटी कमिशनरांच्याकडे अपील केले. अपिलात रा. स्व. संघ हा सार्वजनिक विश्वस्त निधी असल्याचा निकाल झाला. या अपीलाच्या कामात रा. स्व. संघाच्या घटनेचा प्रश्न उपस्थित झाला होता. जॉइंट चॅरिटी कशिमनर आपल्या निकालपत्रात लिहितात.

It is indeed, not known why the respondents failed to bring on record a copy of the constitution containing up to date amendments. The allegation of the applicant appellent that the respondents want to be secerative in the matter of certain particulars about constitution gains garound due to this omission and also the production of

documents Exs 23 and 47 which bear no date of the final adoption of the constitution not even the date of typing or printing and publishing.

आजतागायत केलेल्या दुरुस्त्या असलेली एखादी घटना प्रत रेकॉर्डवर आणण्यात प्रतिवादी असमर्थ का ठरले हे समजणे खरेच अवघड आहे. प्रतिवादीला घटनेसंबंधातल्या काही विशिष्ट बाबी-बाबत गुप्तता बाळगायची आहे या वादीच्या आरोपात तथ्यांश आहे असे वाटण्याला या त्रुटीमुळे आणि पुराव्यांत दाखल केलेल्या नं. २३ व ४७ की ज्यावर कोणत्या तारखेला अंतिम घटना मंजूर झाली याची तारीखच काय, टायपिंग व छपाई प्रकाशित केल्याच्या तारखेचीसुध्दा नोंद ठेवण्यात आलेली नाही, यामुळे आधार सापडतो.

डॉ. कामदारांचे काही आक्षेप आहेत. त्यांच्या मते १९४९ पूर्वीच डॉ. हेडगेवारांनी आठ कलमी घटना तयार केली होती. १९४८-४९ सालात गांधी खुनानंतर संघावर बंदी आली. तत्कालीन गृहमंत्री सरदार पटेल यांच्याबरोबर, संवाद साधण्याचा प्रयत्न झाला. त्यावेळच्या गृह-सचिवांना संघाची लिखित घटना सादर करण्यात आली. १९७२ साली डे. चॅरिटी कमिशनरांच्या पुढे चाललेल्या दाव्यात आणखी एक नवी प्रत दाखल करण्यात आली. ही घटना नावाची चीज बाळासाहेब देवरसांनी तयार केलेली बनावट घटना होती, असा कामदारांचा आक्षेप आहे. या घटनेत सरकार्यवाह पदाची तरतुद करण्यात आली. (हे पद बाळासाहेब देवरसांना प्राप्त झाले). अखिल भारतीय प्रतिनिधी सभेने निवडलेल्या सरकार्यवाहांच्या हातात सर्व सत्ता एकवटली गेली. केंद्रीय कार्यकारिणीवर सदस्य नियुक्त करण्याचा अधिकार सरकार्यवाहांना बहाल करण्यात आला. घटनेची नवी प्रत सादर करताना 'आजपर्यंत संघाची कसलीही लिखित घटना नसल्यामुळे, बदललेल्या परिस्थितीत आम्ही त्याच अलिखित घटनेला लिखित रुप देण्याचा अनुभव घेत आहोत' असे म्हटले होते.

Justice On Trial या पुस्तकात गृहखात्याबरोबर झालेला पत्रव्यवहार छापलेला आहे. १९४९ साली गृहखात्याकडे 'रा. स्व. संघाची घटना' दाखल करण्यात आली. परंतु पुढे तो फक्त घटना मसुदा होता असा बहाणा करण्यात आला. डेप्युटी चॅरिटी कमिशनरांच्यापुढे चाललेल्या केसमध्ये 'अंतिम घटना' म्हणून या मसुद्याला(!)च मान्यता असल्याचे सांगण्यात आले. या घटनेत वेळोवेळी बदल करण्याचे कबुल करण्यात आले. या सर्व गफलतीबद्दल डे. चॅरिटी कमिशनरांनी वर इंग्रजीत कॉमेन्ट केलेली आहे.

जॉइंट चॅरिटी कमिशनरांनी अपीलाचा निकाल पुढीलप्रमाणे दिला.

ORDER

R.S.S. is proved to be a public religious and charitable trust. It be registered as such. The matter is recomanded to Dy. Charity Commissioner with a direction to conclude enquiry under section 19 Bombay Public Trusts Act on the remaining statutory issues.

Decision be informed to the parties by post.

Dated 11th Jan 1978.

(M. S. Vaidya)
Joint Charity Commisssioner
Maharashtra State, Bombay.

या निकालाविरुध्द रा. स्व. संघाच्या वतीने अपील करण्यात आलेले आहे. त्यांचा निकाल अद्याप समजलेला नाही.

या प्रसंगी वाचकांना डॉ. कामदारांचा थोडासा परिचय करुन देणे आवश्यक आहे. डॉ. मनहरकान्त दयाळजी कामदार (एम. बी. बी. एस. हे ५३-५४ वर्षांचे वैद्यकीय व्यवसायी आहेत. त्यांचे वास्तव्य नागपूरला सीताबर्डी भागात आहे. १९४२ सालापासून संघाशी त्यांचा संबंध आहे. श्री. बाळासाहेब देवरसांनी डॉ. हेडगेवारांनी लिहून ठेवलेली संघाची घटना अनाधिकाराने बदलली; कोर्टाची दिशाभूल केली. इ. गंभीर स्वरुपाचे आक्षेप डॉ. कामदारांनी कोर्टातून केलेले आहेत. सुप्रिम कोर्टात पर्यंत कामदारांनी दाद मागितली. राष्ट्रपती, पंतप्रधान, खासदारांना पत्रे पाठवून त्यांनी या सर्व प्रकरणाची माहिती कळवली. नागपुरातील वर्तमानपत्रांनी त्यांना दाद दिली नाही. आर.एस.एस. च्या दादा मंडळींनी डॉ. कामदारांना वेडा ठरवून तसा प्रचार करण्यालाही मागेपुढे पाहिले नाही. केसमध्ये दिलेल्या वकिलांवर दबाव येऊ लागताच कामदारांनी कायद्याचा अभ्यास केला व स्वत:च केसेस चालविण्यास सुरुवात केली. डॉ. कामदार हा विलक्षण जिद्दी माणूस आहे, बाळासाहेब देवरसांनी कोर्टापुढे खोटे बोलून कोर्टाची दिशाभूल केली. अशा आरोपाखाली एक फिर्याद डॉ. कामदारांनी नागपुरच्या न्यायालयात दाखल केली. बाळासाहेब देवरसांना त्यावेळी अटक झाली. परंतु या अटकेची साधी बातमीदेखील वर्तमानपत्रात येऊ शकली नाही. जॉइंट चॅरिटी कमिशनरांनी दिलेल्या निकालाप्रमाणे डे. चॅरिटी कमिशनरांनी रा. स्व. संघाच्या आर्थिक व्यवहारांची चौकशी करावी यासाठी कामदारांना हायकोर्टात रिट पिटीशन दाखल करावा लागला. त्याबाबतीत त्यांनी घेतलेल्या कष्टाचे वर्णन करणे शब्दापलीकडेच आहे.

रा. स्व. संघाच्या मूळ घटनेबाबत डॉ. कामदारांचा युक्तिवाद सुप्रीम कोर्टाने अमान्य केलेला आहे. त्यावर आता कामदारांनी Review ची मागणी केलेली

आहे. जी संघटना इतक्या गुप्तपणे कार्य करु पाहते तिच्याविरुध्द आणीबाणीशिवाय अन्य कोणता उपाय आहे, अशी विचारणा करणारा अर्ज न्यायमुर्ती शहा कमिशनपुढे कामदारांनी दिला होता. जुलै १९७७ मध्ये लोकसभेत खासदार कन्वरलाल गुप्ता यांनी तत्कालीन अर्थमंत्री यांना प्रश्न विचारुन भारतातील आयकर थकबाकीदारांची यादी मागितली. या यादीत रा. स्व. संघाचे नाव आहे. १ कोटी १० लक्ष रुपयांची आयकर थकबाकी संघाच्या नावावर आहे. जनता पक्षाच्या राजवटीत या थकबाकीच्या वसुलीचे किती प्रयत्न झाले हे कळणे अवघड आहे. मध्यन्तरी एका वर्तमानपत्रात संघाला आयकरात सूट देण्यात आल्याची बातमी प्रसृत झाल्याचे माझ्या वाचनात आले होते. असे झाले असेल तर त्याबद्दल फारसे आश्चर्य बाळगण्याचे कारण नाही. संघाच्या आयकराबाबत चालू असलेल्या केसमध्ये संघाच्या वतीने रा. स्व. संघ ही 'धर्मदाय' संस्था असल्याचे सांगण्यात आले. डेप्युटी चॅरिटी कमिशनपुढे 'akin to political activities' व आयकर खात्यापुढे धर्मदाय असा संघाचा डबल रोल आहे. संघाच्या आर्थिक व्यवहाराबाबत श्री. बाळासाहेब देवरसांनी केसरी पत्राला दिलेल्या मुलाखतीत संघाचा सर्व खर्च गुरुदक्षिणेतून चालत असल्याचा निर्वाळा दिला आहे. संघाचे हिशोब पै-पाय आणा लिहिलेले असतात अशी ठाम प्रौढी-प्रचारात करायला ही मंडळी मागेपुढे पाहात नाहीत. मूळ प्रश्नांचे उत्तर मात्र दिले जात नाही-संघाला सार्वजनिक विश्वस्त निधी कायदा का लावला जाऊ नये? संघाला राजकीय पक्षाप्रमाणे मोकळीक हवी असेल तर संघ राजकीय संघटना आहे असे का जाहीर केले जाऊ नये? संघजनांनी याबाबतीत गुप्तता पाळण्यासाठी कितीतरी भानगडी करुन ठेवल्या आहेत.

केंद्रीय गृहखात्याने १९४९ साली अधिकृत लिखित घटना प्रतीची मागणी केली होती. त्यावेळी संघाने रितसर घटना तयार करण्यासाठी एक समिती नियुक्त केली होती. या समितीचे एक सदस्य पुणे विद्यापीठात एका महत्त्वाच्या शाखेचे प्रमुख आहेत. त्यांच्या मित्रांनी तयार केलेला 'घटना मसुदा'केराच्या टोपलीत जाऊन पडला आणि पुण्यातील एका फौजदारी वकिलाने खिशातून एक कागद बाहेर काढून ही घ्या घटना म्हणून सर्वांना थंड केले. या प्रकारानंतर प्राध्यापक महाशयांनी संघाला कायमचा रामराम ठोकला. संघाच्या कार्यातील 'गनिमी कावा' हा अंतर्गत व्यवहारातही स्पष्टपणे जाणवतो. वरवर पाहणाऱ्याला यात काही वावगे आढळत नाही. धावपळीत असलेला माणूस खोलात जाऊन पाहण्याचे कष्टही घेत नाही, घेऊ शकत नाही.

गुरुदक्षिणेच्या हिशोबाबाबत संघाने केलेली घटनात्मक मखलाशी या गनिमी काव्याचा ऐतिहासिक पुरावा आहे.

२०-४-१९७१ रोजी हायकोर्टापुढे दाखल झालेल्या मूळ घटनेत

(a) Article 5' THE FLAG

While recognising the duty of every citizen to be loyal to and to respect the State Flag, the Sangh has as its Flag, the Bhagwa Dhwaj the age old symbol of Hindu culture. अशी नोंद आहे.

दि. २२-३-१९७२ डेप्युटी चॅरिटी कमिशनरांच्या कोर्टात दाखल केलेल्या कागदपत्रात

While recognising the duty of every citizen to be loyal to and to respect the State Flag, the Sangh has as its Flag, the Bhagwa Dhwaj the age old symbol of Hindu culture, which the Sangh regards as his Guru.

अशी दुरुस्ती नोंद आहे. भगव्या ध्वजाला गुरु मानण्याची ही घटना-दुरुस्ती कोणी केली? कोणत्या तारखेला केली? कशी केली? हे गौडबंगाल अद्याप तरी कोणाला कळलेले नाही.

मूळ घटना प्रतीत कलम २२, दि. २४-४/७१ रोजी हायकोर्टात दाखल केलेल्या प्रतीप्रमाणे.

The all offerings, gifts, donations etc. received for Sangh purpose by the branches, shall constitute the Sangh Funds.

दि. २२-३-७२ रोजी डेप्यु.चॅरिटी कमिशनपुढे दाखल केलेल्या कागदपत्रात कलम २२, The Guru Dakshina received for Sangh purpose by Sangh Shakha, Shall constitute the funds of that Shakha.

गुरुदक्षिणा शाखेवर जमवली जाते. आणि शाखेमार्फतच ती खर्च केली जाते अशी 'शिस्तबध्द' भूमिका संघाने घेतली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचार तंत्र ठरुन गेलेले आहे. 'फॅसिस्ट' म्हटले की संघजनांना 'शिवी' दिल्यासारखे वाटते. परंतु एखादी खोटी गोष्ट पुन: पुन: सांगण्यात हेतू कोणता असतो? हे तंत्र का वापरावे लागते. माझा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी एक अनुभव सांगतो. मध्यन्तरी देवाच्या आळंदीतील वारकरी शिक्षण संस्थेत अस्पृश्यता कशी पाळली जाते याबद्दल वर्तमानपत्रांतून चर्चा झाली. गं. बा. सरदार, रा. प. नेने, दया पवार यांच्या सारख्या मंडळींनी आळंदीला समक्ष जाऊन या प्रकाराची खातरजमा करुन घेतली. संस्थेच्या चालकांनी देखील चूक दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले. परंतु पुण्याच्या तरुणभारत या संघीय दैनिकाने या

प्रकाराला अत्यंत हिडिस स्वरुप देण्याचा प्रयत्न केला. खोटीनाटी पत्रे छापली. ज्या दलित वारकरी विद्यार्थ्याने तक्रार केली होती, त्याच्या चारित्र्यावर जाहीर आरोप लावण्यासही मागेपुढे पाहिले नाही. संघाचे 'दलित प्रेम'अशा वेळी उतू गेले तर नवल कसले ? रकानेच्या रकाने खोट्या मजकुराने व्यापले.

त्या दलित कार्यकर्त्याने एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला. ती मुलगी ससून हॉस्पिटलमध्ये प्रवेशित आहे. अशी दर्दभरी माहिती एका वार्ताहराने आपल्या संपादकांना सांगितली. पुढे प्रत्यक्षात ती मुलगी नसून मुलगा असल्याचे प्रसिध्द झाले. ससून हॉस्पिटलमध्ये यापैकी कोणीच नव्हते.

त्या मुलावर कसा बलात्कार केला याची 'कपोलकल्पित' हकीकत आपल्या वर्तमानपत्रात या महाभागाने छापली. त्या बिचाऱ्या कार्यकर्त्याला पोलिसांनी अटक करुन रिमांड काढला. त्याला विलक्षण मनस्ताप सहन करावा लागला. आम्ही कोर्टापुढे जामीनकी अर्ज दिला त्यावेळी वर्तमानपत्रात छापून आलेली बातमी व प्रत्यक्ष तक्रार यात जमीन अस्मानचे अंतर आढळून आले. तक्रार करणाऱ्या मुलाने असा काही प्रकार झाल्याचे मुळात पोलिसांना सांगितलेच नव्हते. क्षुल्लक भांडणाचा उल्लेख होता. प्रत्यक्ष कोर्टापुढे आलेल्या तक्रारीतील शब्दनशब्द आम्ही वार्ताहर परिषदेपुढे ठेवला-व असत्य प्रचाराचे पुरते थोबाड फोडले तरी तरुण भारत कारांची नीति कायमच. खाजगी खोटी पत्रे छापून पैसे खाल्ल्याचा आरोप केला. आम्ही आव्हान दिले. या पत्रांची प्रत्यक्ष जागेवर जाउन शहानिशा केली. तेथील पोलिसखात्याला देखील विचारले. परंतु तेथे साधी कंप्लेट देखील नव्हती. अस्पृश्यतेविरुध्द झगडणाऱ्या त्या तरुणाला आळंदीतील गुंडांकडून जीवघेणी मारपीट झाली.

आळंदीच्या सत्याग्रहाबद्दलही 'तरुण भारत'कारांनी असेच 'कर्तव्य' बजावले. सुर्यप्रकाशात सुर्यप्रकाशाइतक्या स्पष्टपणे घडलेल्या प्रकाराबद्दल 'तरुण भारत'कारांनी छपाई चालाखी केली. मानाची घोडी पुढे काढून दलितांना सन्मानाने सामावरून घेण्याचा सल्ला यांच्या हिंदूमेंदूतून बाहेर पडला नाही. दलित सत्याग्रहींनी माउलींच्या पालखीचा अपमान केला. अशी खेडसाळ बातमी या पत्राने प्रसृत करुन दलितांना मारहाण व्हावी अशी चिथावणी दिली. त्या दिवशी सत्याग्रहाची छावणी बनलेल्या हराळे वैष्णवांच्या धर्मशाळेला आग लावून 'लाक्षागृह'बनविण्याचा मनसुबा अनेकांनी बोलून दाखविला होता. 'अस्पृश्यता ही हिंदुधर्माला लागलेला कलंक आहे.' अशी शाब्दिक पोपटपंची करणारांची ऐनवेळी अशी चाल असते याचे

हे जिवंत उदाहरण आहे. आळंदीच्या वारकरी संस्थेत शिरकाव करुन त्या मंडळींनी तिचे ब्राह्मणीकरण करुन टाकले आहे. विद्यार्थ्यांच्या गळ्यात टाळ अडकवून शंकराचार्यांच्या पुढे दिंड्या नेण्याची हिकमत ज्ञानप्रबोधिनीचे पेंडसे लीलया करु लागले आहेत. मागे एकदा पंढरपूरला तनपुरे महाराजांच्या विश्वशांतीयज्ञ विरोधी सत्याग्रहात हीच मंडळी तनपुऱ्यांच्या बाजूने उभी होती. सत्याग्रहींना त्यांनी अगदी शिस्तीत मारहाण केली.

म. गांधीचा खूनी नथुराम गोडसे संघात जात होता ही बाब संघवाल्यांनी कितीही लपवली तरी जनतेला हे माहित आहे. गोडशाचा मेंदू संघातच तयार झाला हे पुणेकरांना पूर्ण ठाऊक आहे. परंतु संघजनाचा प्रचार अगदी उलटा.एक एक नागरिक निर्माण करायला निघालेल्या या संघटनेतून निर्माण होणारी पैदाईश किती भयावह असते याचा एक नमुना म्हणून पुण्याच्या ॲड. ग. नी. जोगळेकरांचे नाव सांगता येईल. नुकत्याच झालेल्या महानगरपालिका निवडणुकीत यांचा १६००-१७०० मतांनी पराभव झाला. या भल्या गृहस्थाजवळ संघाबद्दल ज्वाजल्य अभिमान आहे. त्यांचे पुण्याच्या 'सकाळ' पत्रात दोन लेख प्रसिध्द झाले आहेत. त्यातील एक उतारा नमुनादाखल देतो-

विवाह समारंभात कोणता खर्च बाष्कळ? यात जेवणाचा आग्रह करण्याचे साधे उदाहरण घेऊ. आग्रह करु नका, का तर लोक पानात टाकतात आणि अन्न वाया जाते. ताटात टाकलेले अन्न वाया जात नाही. पंगत केव्हा संपते याची वाट पहात बाहेर पाच-दहा गरीब माणसे उभी असतात. तुम्ही पाने लख्ख चाटूनपुसून ठेवली तर वर्षातून काही दिवस तरी जिलेबी, श्रीखंड, भजी अशा गोष्टींची चाखायला मिळणारी चवही या बिचाऱ्यांच्या वाटणीला येत नाही. ती सारीजण खट्टू होतात.

औध्दत्याने व अहंकाराने बोलणे हा यांचा खास गुण. ब्राह्मण्य डोक्यात व अंत:करणात पुरेपुर भिनलेले. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे भले गृहस्थ आता डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या गव्हर्निंग कौन्सिलवर निवडून आले आहेत. सुधारकाग्रणी आगरकरांनी प्राचार्यपद भूषविलेल्या या संस्थेत जोगळेकरांची वर्णी लागली. आगरकर ते ग. नी. जोगळेकर हा या संस्थेचा प्रवास खास द्योतक आहे. संघीय मंडळींनी गेले दोन वर्षात निरनिराळ्या संस्था ताब्यात घेण्याचा सपाटा लावला आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिक्षण प्रसारक मंडळी, महाराष्ट्र एज्यु. सोसायटी या तीनही मातब्बर संस्थात या मंडळींनी आपले बस्तान पूर्णपणे बसवलेले

आहे. या संस्थेत बहुसंख्य प्राध्यापक, अध्यापक, खास यांच्या पठडीतील. महाविद्यालयातून नेमावयाच्या या स्टाफसाठी पुणे विद्यापीठाने खास निवड समिति नियुक्त केलेली आहे. विद्यापीठ कक्षेतील इतर सर्व महाविद्यालयांनी या समितीला मान्यता दिली. परंतु पुण्यातील वर उल्लेखिलेल्या संस्थानी स्वायत्ततेच्या नावाखाली समितीच्या कार्यवाहीस वाटाण्याच्या अक्षता लावलेल्या आहेत.

मराठी साहित्य परिषदेसारख्या, साहित्य संस्थाही ताब्यात घेण्यात ही मंडळी यशस्वी झाली आहेत. साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष वि. रा. करंदीकर, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. पु. भा. भावे ही सर्व नावे डोळ्यापुढे आणली की कारभार लक्षात यावा. श्री. वि. रा. करंदीकर राष्ट्रीय विचार प्रसार मंडळाचे अध्यक्ष आहेत. हे मंडळ संघाचेच उपांग असून दैनिक 'तरुण भारत'सारख्या वर्तमानपत्रांवर यांचा कब्जा आहे. या मंडळींनी साहित्य परिषदेच्या को. ऑप सभासदांत कोणाची वर्णी लावावी ? सोबतकार ग. बा. बेहरे, न.म. जोशी यांचीच !

दुसरे एक प्रसिध्द साहित्यिक श्री. द. मा. मिरासदार अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष असून शिक्षण प्रसारक मंडळींच्या गव्हर्निंग कौन्सिलवर ते गवंडी पॅनेलमधून निवडून आले आहेत.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पतित पावन संघटना, विवेकानंद सोसायटी, जनता युवा, राष्ट्रसेविका समिती, विश्वहिंदू परिषद या साऱ्या बाह्यांगांचे अंतरंग एकच रा. स्व. संघ ! देशातील मोठमोठ्या वृत्तपत्र संस्थांतून यांनी शिरकाव केलेला आहे. महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस या पत्रांची माहिती असणाऱ्याना हा शिरकाव डोळे मिटून पाहावे लागत आहे. 'समाचार' भारतीचे विसर्जन झाल्यावर हिंदुस्थान समाचारचा वधारलेला भाव अनेकांना न बोलता द्यावा लागत आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, प्रसारभारती इ. माध्यमे गेल्या दोन वर्षात या मंडळींनी शिताफीने हस्तगत केलेली आहेत.

निरनिराळ्या बँकांच्या मॅनेजमेन्टमध्ये या मंडळींना वाव मिळाला आहे. बँक ऑफ महाराष्ट्रच्या प्रमुख संचालकांचे खाजगी चिटणीस म्हणून नुकतीच एका संघियाची नियुक्ती झालेली आहे. त्यामुळे 'सोव्हिनिर्स'काढून जाहिराती मिळवावयाचा उद्योग मोठ्या प्रमाणावर सुरु झाला आहे. एखादा खाजगी सचिव एवढे सारे करतो असेही म्हणता येणार नाही. तेथे असलेल्या कोंडयाळात ही नवी भर एवढे म्हणता येईल.

हा सर्व शिरकाव कर्तबगारी व स्पर्धा यातून झाल्याचा आव ही मंडळी आणतात. परंतु दलितांना पाजण्यासाठी 'बोधायन'तयारच. 'सवलती कशाला मागता? राखीव जागा कशाला?' दलितांना मिळणाऱ्या सवलती व राखीव जागांच्या विरुध्द गेले दोन वर्षे ही मंडळी पध्दतशीर हाकाटी करीत आहेत. दलितांना मिळणाऱ्या सवलती व राखीव जागांची शिकार त्यांना साधावयाची आहे. सवलतीसाठी 'आर्थिक गरिबी'निकष असावा अशी मागणी सरसंघचालकांनी केलेली आहे. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर प्रश्नावर यांचे पितळ आणखी उघडे पडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला द्यायला यांचा मुळापासून विरोध. परंतु महाराष्ट्र जनता पक्षाने ठराव करुन मागणी केली. या प्रश्नावरुन मराठवाड्यात दलित संसारांची होळी झाली. आम्ही काही सहकाऱ्यानी त्या काळात धावाधाव करुन दंगलीच्या हकीगती उजेडात आणल्या. काही शंका स्पष्ट बोलून दाखवल्या. सरसंघचालकांचा १-२ महिन्यानंतर औरंगाबादला (त्यांच्या भाषेत खडकीला) दौरा झाला. त्यांनी या दंगलीच्या निषेधाचे एक अक्षर उंच्चारले नाही. मग नामांतराच्या मागणीवर काय बोलणार? संघीय वृत्तपत्रांच्या साखळीने आम्हालाच धारेवर धरले. याच काळात संघजनांच्या गनिमी काव्याचा एक भन्नाट अनुभव मला घ्यावा लागला.

दंगलग्रस्त दलितांना न्याय व साहाय्य कसे मिळाले या कामात व्यग्र असताना एके दिवशी सकाळी दोन इसम माझ्या घरात अचानक शिरले. पैठणच्या धरणग्रस्त परिषदेची त्यांनी आठवण करुन दिली. व आम्ही गावाहून इकडे येत असल्याचे त्यांनी सांगितले. संघाचे कार्यकर्ते असल्याची त्यांनी ओळख करुन दिली. धरणग्रस्त, पुनर्वसन, प्रचलित राजकारण, नामांतर प्रश्न यावर आमचे बोलणे झाले. मराठवाड्यांतील दंगलीचे ते समर्थन करु पाहात होते. पुढे आठवडाभरात पुण्याच्या सोबत साप्ताहिकात माझी एक बनावट मुलाखत, प्रश्नोत्तर स्वरुपात छापून आल्याचे पाहून मला आश्चर्य वाटले. संघजन, सोबतकार यांची मसलत होऊन हा बनाव घडणून आणलेला असावा. मराठवाडा दैनिकाचे संपादक श्री. अनंतराव भालेराव व श्री. गोविंदभाई श्रॉफ, माझे मित्र ॲड. काशिनाथ नावंदर यांचा अरेतुरे व शिव्यांच्या भाषेत उल्लेख माझ्या तोंडी घातला होता. वृत्तपत्रनीतिची लाजलज्जा सोडून सर्व मजकूर छापला होता. मी तातडीने संबंधितांना पत्रे पाठविली व खुलासा केला. शेवटी माझा खुलासा सोबतकारांच्याकडे पाठवून दिला व प्रसिध्दीची कायदेशीर

मागणी केली. मी मुलाखत दिलेली नव्हती. तशी मागणीही कोणी केली नव्हती. याउपरही आमच्या संभाषणाची टेप वगैरे असल्यास प्रसिध्द करण्याची मी मागणी केली. सोबतकारांनी खुलासा छापला. परंतु आपली मल्लीनाथी जोडली व टेप नसल्याचे सांगितले. दैनिक तरुण भारताकारांनीही ही बनावट मुलाखत छापली होती. त्यांनी माझा खुलास छापला व परत मल्लीनाथी जोडली. त्यांच्या सर्व साखळी पत्रांतून ही बनावट मुलाखत प्रसिध्द करण्यात आली.

श्री. अनंतराव भालेरावांनी मला पाठविलेल्या पत्रात त्यांना आलेला अशाच स्वरुपाची अनुभव कळवला. त्यांच्या घरी एका पोलीस अधिकाऱ्यांशी बोलत बसले होते. तशात पूर्वाश्रमीच्या जनसंघाचे एक तरुण कार्यकर्ते त्यांच्याकडे आले. संभाषणात त्यांनी भागही घेतला. थोड्याच वेळात त्या पोलीस अधिकाऱ्याला काहीसा संशय आला. त्याने अनंतरावांच्याकडे आपली शंका व्यक्त केली. शेजारी बसलेल्या कार्यकर्त्याच्या पिशवीत चोरुन टेपरेकॉर्डर ठेवलेला असावा असे त्याने टीक आवाजावरुन हेरले. अनंतरावांनी पिशवी तपासली. तेव्हा तो प्रकार उघड झाला. अनंतरावांनी त्या कार्यकर्त्याला जाब विचारला. त्या महाभागाची भलतीच फजिती झाली होती. तो गयावया करुन लागला. अनंतरावांनी त्याला टेपवरील मजकुर खुशाल छाप म्हणून सांगितले, परंतु ही लबाडी कशासाठी? असे विचारले.

सोबतकार बेहेऱ्यांनी माझ्या मुलाखतीची टेप नसल्याचा खुलासा केला. परंतु अनंतराव भालेरावांना मात्र सांगताना स्वत:जवळ टेप असल्याचे खोटेच सांगितले. अनंतरावांनी मला हा प्रकार सांगितला. या साऱ्या प्रकारांना फॅसिस्ट या शिवाय कोणते विशेषण लावावे?

रा. स्व. संघाचा स्वत:चा असा एक अहंकार आहे. गेली ५० वर्षे ही संघटना काम करीत आहे. त्यांच्या पाठीमागे महाराष्ट्रात तरी ब्राह्मणवर्गाशिवाय अन्य कोणी उभे राहात नाही.

ब्राह्मणवर्ग 'सुशिक्षित' आहे. परंतु या सुशिक्षित वर्गाचे सर्वात मोठे नुकसान संघाने केलेले आहे. 'ब्राह्मण्याच्या' हव्यासापायी या वर्गाचा तळच्या समाजाशी संबंध राहिलेला नाही. हिंदू संस्कृती व परंपरांच्या संरक्षणाचे उद्दिष्ट ठेवून हिंदू राष्ट्रवादाचे स्वप्न साकार करावयाला निघालेल्या या संघटनेकडून बदलाची अपेक्षा बाळगणारांना काय म्हणावे?

संघात अंतर्गत लोकशाही नाही. त्यामुळे 'चर्चा' ह्या प्रकारचे त्यांना वावडे.

गोळवलकरगुरुजींची एक आठवण मोठ्या चविष्टपणे सांगितली जाते. गुरुजींना एकाने प्रश्न विचारला. गुरुजी फक्त हसले आणि म्हणाले, हाच प्रश्न तुम्ही स्वत:ला आणखी दहा वर्षे विचारीत रहा. तुम्हालाच उत्तर मिळेल. मनात प्रश्न निर्माण होणे हा मूळी दोषच. 'विश्वास' कशाला म्हणतात?''

संघावरील टिकाकारांना 'संघासारखी ताकद तुम्ही उभारुन दाखवा' असे उत्तर मिळते. उत्तर टाळण्याचा हा उध्दट प्रकार आहे. आणि या पध्दतीने संघाने ब्राह्मणी अहंकार जोपासला आहे. भाषेचा उच्चार, 'ण'चा 'न'होणे, 'नाही'ला 'न्हाई'म्हणणं त्यांना खटकते. इतकेच काय जेवणाच्या पंगतीत मीठ कोठे काढावे, कोशिंबीर कोठे वाढावी याचीही बारकाईने पाहाणी करुन ही मंडळी इतरांना हसणार.

दोन अडीच वर्षापूर्वी श्री. एस. एम. जोशींनी जनता पक्षाच्या एका मेळाव्यात मी लिहिलेल्या 'संघाची ढोंगबाजी'या पुस्तिकेबद्दल नाराजी व्यक्त केली होती. गलबतात बसलेल्या एखाद्या प्रवाशाला जशा उलट्या होतात तसे आमच्या बाबा आढावांचे झाले आहे. समुद्राचे पाणी पाजलें की पोटातली घाण आपोआप बाहेर निघून जाते व उलट्या थांबतात अशी ललित संभावना करणाऱ्या एस. एम. प्रभृती मंडळींवर काळाने केवढा सूड उगवला आहे! '' संघ जनसंघामुळे जनतापक्षाचे नुकसान होत आहे अशी जाहीर तक्रार दिल्लीत भरलेल्या समाजवाद्यांच्या मेळाव्यात एस. एम. जोशींनी करावी लागली आहे. मधु लिमये राजनारायण यांच्याबाबत आता न बोललेलेच बरे.

संघाच्या हिंदू राष्ट्रवादाला आधुनिक राष्ट्रवादाचे आंगडे-टोपडे चढवून ही मंडळी गाडा हाकू पाहात होती. आर्थिक परिस्थितीच्या कार्यक्रमाला संघ-जनसंघ विरोध करणार नाही अशा भ्रमात मशगूल होती. या देशातील कष्टकरी वर्गाला चार पैसे वरुन वाढवून द्यायला या मंडळींचा किती पाठिंबा असतो हे आकाशवाणी ऐकणारांनी जरुर जाहीर करावे. विक्रीकर विधेयकाच्या विरुध्द झालेल्या चळवळीत या मंडळींचा पाठिंबा व्यापारी वर्गाला. या देशातील भांडवलदार बहुसंख्येने हिंदू आहेत यात संघाचा काय दोष? पुण्याच्या ज्ञानप्रबोधिनीचे व किर्लोस्करांचे, महाराष्ट्र एज्यु. सोसायटी व निरनिराळ्या राज्यांतून जमविलेल्या कोट्यावधी रुपयांच्या निधीत पडणारी भर व तिचा मनमुराद विनियोग झाला तर संघ त्याला काय करणार?.... सरसंघचालकांना साधा गुरुदक्षिणेचा हिशोब देखील माहित नसतो आणि यावर सर्वांनी विश्वास ठेवला पाहिजे. संघाचा शिरकाव गेले दोन वर्षात अनेक

ठिकाणी झालेला आहे. आणीबाणी व हुकुमशाहीच्या राज्याचे हे फलित आहे. पोलिसांच्या डोक्यातील 'हिंद' जागा होताना मराठवाड्यांत दिसले. लष्कराचे मला माहिती नाही.

याच संघाबद्दल आणखी एका बाबतीत गंभीरपणे विचार होणे आवश्यक आहे. या देशात आणीबाणी व हुकुमशाहीसारखेच एखादे संकट परत येईल की काय अशी शंका अनेकांच्या मनाला चाटून जात आहे. पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु देवदत्त दाभोळकर यांनी लष्करी हुकुमशाहीच्या धोक्याबद्दल एका लेखात इशारा दिला आहे. अशा प्रकारची हुकुमशाही येईल असे मला वाटत नाही. परंतु जर आलीच तर तिचे स्वागत रा. स्व. संघ सर्वप्रथम करील. इंदिरा गांधी व संजय गांधी यांच्यापुढे शरणागती पत्कणाऱ्या मंडळींचा तो नुसता डावपेच नव्हता तर एकचालकानुवर्तित्व, निमलष्करी,काहीशा गुप्त पध्दतीने काम करणाऱ्या,आर्थिक-सामाजिकदृष्ट्या स्पष्टपणे प्रतिगामी असणाऱ्या ब्राह्मणी संघटनेकडून अन्य अपेक्षा करणे व्यर्थ होय. विनोबाजी भाव्यांच्या आश्रमापासून चारही शंकराचार्यांच्या संमेलनांपर्यंत मजल मारणाऱ्या सरसंघचालकांना संघासाठी एक नैतिक वलय हवे आहे. ती नैतिकता सनातन मूल्यावर आधारित आहे. ब्रह्माचा साक्षात्कार झालेले विनोबा, गंगामैय्याची कृपा पावलेले जयप्रकाश, विज्ञानालाही धडे देऊ पाहणारे माजी पंतप्रधान मोरारजी या सर्वांचा उदोउदो करण्यात संघाचा हितस्वार्थ स्पष्ट आहे. आधुनिक लोकशाही, स्वातंत्र्य, समता, विज्ञाननिष्ठा, इहवाद, या संकल्पना व मूल्ये संघाला मान्य नाहीत. संघ तसे स्पष्टपणे म्हणणार नाही. तेवढे चातुर्य त्यांनी ५०-५५ वर्षात कमावलेले आहे. हे काहीही असले तरी भारतीय जनमानस संघाच्या हेतूबद्दल सदैव शंका बाळगत राहील. प्रसंगी संघ-जनसंघाला गंगेचे पाणी पाजल्याशिवाय देखील राहणार नाही. ब्राह्मण व या देशातील कष्टकरी दलित समाजाचे हे नाते तसे फार सनातन आहे.

संघाचे स्वरुप गेले २-२।। वर्षात आणखी उघडे झाले आहे. आर्थिक, सामाजिक परिवर्तनाला त्याचा मूलत: विरोध आहे. अशा बाजारबुणग्यांची भरती करुन संपूर्ण क्रांतीचा महामोर्चा पुढे जाईल यावर भारतीय जनता कदापि विश्वास ठेवणार नाही.

(पूर्व प्रसिध्दी : त्रैमासिक पुरोगामी सत्यशोधक, ए/मे/जू-१९७७
व ए/मे/जू-१९७९)

●●●●

दिग्नाग प्रकाशन सूची

१)म. जोतीबा फुले - सर्वंकष सामाजिक क्रांतीचा प्रणेता -डॉ. एन. डी. पाटील		३० रु.
२) शाहिर अमरशेख : वेध एका क्रांतिकारी वादळाचा -डॉ. अजीज नदाफ		७०रु.
३) म. फुले आणि मुस्लिम समाज -डॉ. अजीज नदाफ		३०रु.
४) म. फुले स्मृतीदिन हाच खरा शिक्षक दिन -प्रा. प्रतिमा परदेशी		२५ रु.
५) सत्यशोधक विवाह -प्रा. प्रतिमा परदेशी		१० रु.
६) प्रेमाचा अधिकार आणि हिंसेचा प्रश्न -डॉ शर्मिला रेगे		१५ रु.
७) काळ्या स्त्रियांचा विचार व लढा -डॉ शर्मिला रेगे		४० रु.
८) हिंदु कोड बिल ते 'ऑनरकिलिंग' -प्रा. प्रतिमा परदेशी		३० रु.
९) ढोंगी रा.स्व.संघापासून सावध! - डॉ. बाबा आढाव		३० रु
१०) भिल्ल आदिवासींचा स्वातंत्र्य लढा -दिनानाथ मनोहर		२५ रु.
११) राज्यघटना फेरआढाव्यामागील ब्राह्मणवाद -प्रा. प्रतिमा परदेशी		३० रु.
१२) डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती -प्रा. प्रतिमा परदेशी		३० रु.
१३) मनुस्मृती, स्त्रिया आणि डॉ. आंबेडकर -प्रा. प्रतिमा परदेशी, सरोज कांबळे		२० रु.
१४) महामानवांच्या बदनामीचे ब्राह्मणी षडयंत्र निकृती ते शिवराय बदनामीचा प्रतिवाद -प्रा. प्रतिमा परदेशी, किशोर ढमाले		३० रु.
१५) विश्वसम्राट बळीराजा -प्रा. प्रतिमा परदेशी		१५ रु.
१६) अंधश्रध्दा आणि स्त्रीशोषण - अप्पाराव चव्हाण		३० रु.